म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७४५६

# शिवाजी
आणि
# चंद्रराव मोरे

[एक ऐतिहासिक निबंध.]

लेखकः---श्रीयुत चिंतामण विनायक वैद्य.



REFBK-0002457

...वती मंडळ, पुणें.
...न १९२४.

किंमत चार आणे.

REFBK-0002457

# शिवाजी आणि चंद्रराव मोरे.

चंद्रराव मोरे जावळीचे राजे यांस दग्यानें ठार मारून त्यांचें संपन्न राज्य शिवाजीनें घशाखालीं टाकलें असा इतिहास मानणारा एक पक्ष आहे. आणि एक पक्ष शिवाजीमहाराजांनीं राजरोसपणें चंद्ररावावर स्वारी केली असतां जावळीबाहेर झालेल्या लढाईत चंद्रराव मोरे मारला गेला असें मानणारा आहे. या दोन पक्षांत खरा पक्ष कोणता आणि शिवाजीमहाराजांच्या उच्च चरित्रास नीतिदृष्ट्या हें जावळीच्या मोऱ्यांचें प्रकरण भूषण आहे कीं दूषण या प्रश्नाची सविस्तर चर्चा, रा. त्रिलोकीकर यांनीं याच वादावर रचलेल्या "चंद्रराव मोऱ्यांची तारा" या नाटकाच्या परीक्षणप्रसंगानें या लेखांत विस्तारानें मी करण्याचें योजिलें आहे.

अमुक एक गोष्ट अमुक तऱ्हेनें घडली हें ठरविणें बहुधा नेहमींच मोठें कठीण असतें. खरा इतिहास शोधून काढण्यास historical judgment म्हणजे शुद्ध ऐतिहासिक निर्णायकबुद्धीची अपेक्षा असते हें प्रथम वाचकांस समजावून सांगितलें पाहिजे. आपण आपल्यासमोर किंवा आपल्या काळीं होणाऱ्या गोष्टीसंबंधानें सुद्धां पाहतों कीं एखाद्या वृत्तासंबंधानें साक्षिपुरावा पाहूं लागलें असतां प्रत्यक्ष पाहणारे साक्षीदार सुद्धां निरनिराळी हकीकत सांगतात. यांत पाहणाऱ्यांची निरनिराळी दृष्टि असते इतकेंच नव्हे तर आपल्या मनोवृत्तीप्रमाणें व पक्षपाताप्रमाणें निरनिराळ्या स्वकपोलकल्पित सुद्धां गोष्टी त्यांत घुसडून देतात. मग वृत्त झाल्यानंतर कित्येक वर्षांनीं लिहिलेल्या बखरी किंवा कैफियती किंबहुना इतिहास हे ऐतिहासिक निर्णायकबुद्धीच्या चाळणींत चाळून घेतले पाहिजेत हें उघड आहे, प्रसिद्ध इतिहासकार रॅले यानें जगताचा इतिहास लिहिल्यावर एके दिवशीं आयर्लंडमध्यें त्याच्यासमोर झालेल्या एका खुनासंबंधाच्या मुकदम्यांत निरनिराळ्या साक्षीदारांनीं निरनिराळी हकीकत सांगितलेली पाहून खरा इतिहास लिहिणें किती कठीण आहे, हें ध्यानांत येऊन निराश होऊन आपला लिहिलेला इतिहास फेंकून दिला, ही आख्यायिका प्रसिद्धच आहे. तात्पर्य खऱ्या इतिहासाचें प्रथम साधन—तत्कालीन लिहिलेलीं

पत्रें किंवा लेख—सुद्धां तपासून साक्षीपुराव्याच्या कसोटीस लावून घ्यावे लागतात; मग मागाहून कित्येक वर्षांनीं लिहून ठेविलेल्या हकीकती जास्त कसोशीनें तपासून घेतल्या पाहिजेत हीं गोष्ट सांगितली पाहिजे काय ? अशा दृष्टीनें या वृत्तीच्या हकीकती देणाऱ्या लेखांचे व त्यावरुन भिन्न भिन्न मनोवृत्तींच्या इतिहासकारांनीं आजपर्यंत केलेल्या सिद्धान्तांचें परीक्षण करणें अत्यंत अवश्य आहे; तें आपण यथामति करूं.

इतिहासाच्या ठळक ठळक गोष्टींत वाद नसतो हें उघड आहे. वाद असतो तो त्या वृत्तांच्या तपशिलांत किंवा प्रकारांत आणि त्यावरून इतिहासकार जे आपले तात्विक विचार प्रदर्शित करतात त्यांत असतो. कधीं कधीं ठळक गोष्टींतही कित्येक कल्पनातीव्र लेखक वाद घालतात आणि ते केवळ प्राचीन इतिहासाच्या बाबतींत नसून अलीकडच्या इतिहासांत घालतात. राम किंवा पांडव झालेच नाहींत, कौरव पांडव युद्धांत कौरवांचा जय झाला असून महाभारतकारांनीं हा इतिहास लुच्चेगिरीनें उलटा दाखविला आहे असे वाद उपस्थित करणारे बुद्धिवान् विवेचक आहेत ते आपण सोडून देऊं. पण अलीकडच्या वृत्तांत सुद्धां शेक्सपीयर झालाच नाहीं किंवा विक्रम झाला नाहीं असे सिद्धान्त पुढें येतात हें प्रसिद्ध आहे. असे सिद्धाचा अन्त करणारे सिद्धान्त फार थोडे असून ते आपण बाजूस सारले असतां साधारणपणें असा सिद्धान्त मांडता येतो कीं इतिहासांतील ठळक ठळक गोष्टी झाल्या असें घेऊन त्यांच्या तपशिलासंबंधानें इतिहासकारास विवेचकबुद्धि चालवावी लागते. या सिद्धान्ताप्रमाणें चंद्रराव मोरे जावळीचा राजा असून शिवाजी महाराजांनीं चंद्रराव मोऱ्यास मारून जावळीचें राज्य काबीज केलें ही गोष्ट ढोबळ असून सर्व बखरकारांनीं व तवारीखकारांनीं, मराठी व मुसलमानी दोन्ही पक्षकारांनीं, लिहिली आहे ती खरी व ऐतिहासिक आहे असें धरून आपण तिच्या तपशिलाविषयीं म्हणजे चंद्रराव मोरे कसा मारला गेला व कां मारला गेला याविषयीं विवेचक दृष्टीनें तत्कालीन बखरींचें व अर्वाचीन इतिहासकारांच्या मतांचें परीक्षण करूं. या बाबतींत समकालीन लेख मुळींच नाहींत किंवा त्या प्रसंगांत भाग घेतलेल्या लोकांचेहि लेख नाहींत. असे लेख सुद्धां तपासले पाहिजेत हें पूर्वीं सांगितलेंच आहे. पण ते नसल्यानें समकालीन अथवा प्रत्यक्ष पुराव्याची भानगड येथें करण्याचें प्रयोजन उरत नाहीं. परंतु या बाबतींत नंतर बऱ्याच वर्षांनीं लिहिलेले लेखच

असलें तरी ते आपल्या मराठी लेखकांनीं लिहिलेलें असल्यानें या प्रश्नास ज्यास्त कठिणता आली आहे. उलट पक्षाचे म्हणजे चंद्रराव मोऱ्याकडचे स्वदेशी किंवा मुसलमानी लेख या विषयासंबंधानें नसल्यानें कठिणतेंत भर पडली आहे. सर्वांत अलीकडचे आणि विरोधी भावानें शिवाजीचा इतिहास लिहिणारे जदुनाथ सरकार शिवाजीनें चंद्रराव मोऱ्याचा निंद्य खून केला असें सांगतांना त्यास पुरावा म्हणून कोणी मुसलमानी तवारिखांचा आधार देत नसून मराठी बखरीचाच आधार देत आहेत. यामुळें एक्या प्रकारें हे लेख admission या पुराव्याच्या प्रकाराखालीं येत असल्यानें ते खरेच असले पाहिजेत असें संकुद्दर्शनीं वाटतें. परंतु हे लेख जरी admission या स्वरुपानें अधिक महत्वाचे व लागू असले तरी त्यांचीहि योग्य छाननी करणें जरूर आहे कारण admission स्वरूपाचे लेख सुद्धां conclusive किंवा निर्णायक असूं शकत नाहींत. आणि म्हणून या लेखांचा म्हणजे सभासद १०, चिटणीस ४१, दिग्विजय १२८० शेडगांवकर बखर २० ११ ( जदुनाथ सरकार शिवाजी पृष्ठ ५२) यांत उल्लेखिलेल्या हकीकतीचें आपण परीक्षण करूं.

या हकीकतीचीं तीन स्वरूपें आपल्यापुढें आहेत, त्यापैकीं खरा प्रकार कोणता हा प्रश्न आपल्यास निर्णीत करावयाचा आहे. जदुनाथ सरकार म्हणतात कीं, शिवाजीनें चंद्रराव मोऱ्याच्या राज्याचा लोभ धरून त्यास पाडाव करण्यासाठीं मुलीची मागणी करण्याच्या मिषानें वकील पाठवून त्यांजकडोन विश्वासघातानें त्याचा खून करविला आणि नंतर एकाएकीं विस्काळित झालेल्या राज्यावर हल्ला करून जावळी घेतली. दुसरी हकीकत पारसनीस व किनकेड अशी देतात कीं लग्नाचें बोलणें बोलण्याकारितां शिवाजीकडोन वकील गेले आणि वकील आणि चंद्रराव मोरे यांच्या दरम्यान काय बाचाबाची झाली तें समजत नसून आपसांत मारामारी सुरु होऊन चंद्रराव मारला गेला आणि तिसरी हकीकत अशी कीं, बोलण्यांत बाचाबाची झाली आणि मारामारी करीत वकील जावळीबाहेर निघून आले. तेथें शिवाजीमहाराज फौज घेऊन पोंचले, व त्यांनीं जावळीवर हल्ला केला. चंद्रराव फौजेनिशीं बाहेर पडून लढाई झाली त्यांत मारला गेला. असो, असें ह्या हकीकतीचें वादग्रस्त स्वरूप असून खरा प्रकार काय घडला हें आपणांस पाहणें आहे. तेव्हां प्रथम या गोष्टीचे साक्षिदार काय सांग-

तात हें पाहून त्यांचें म्हणणें कितपत ग्राह्य आहे याचा आपणांस विचार करावयाचा आहे.

स्वराज्य स्थापनेचा संकल्प करुन शिवाजीमहाराजांनीं राज्य कमविण्यास प्रारंभ केला आणि बारा मावळें काबिज करुन कल्याण काबीज केलें. माहुली किल्ला घेऊन राजगड किला बांधून तेथें राजधानी प्रथम केली व नंतर जावळींचे मोरे, व शृंगारपुरचे सुर्वे जिंकण्याचा विचार कला. तेव्हां सभासद लिहितो रघुनाथ बल्लाळ सबनीस यांस सांगितलें कीं, चंद्रराव मोरे यांस मारल्या विना राज्य साधत नाहीं. त्यास तुम्हांवांचून हें कर्म कोणास न होय. तुम्ही त्याजकडे हेजिबीस जाणें, बरोबर धारकरी शे सव्वाशें माणूस दिलें. त्यानें जावळीस जाऊन राजास कळविलें आम्हीं शिवाजीकडोन आलों तह रद्द करणें आहे. त्यांनीं बोलावून घेतलें. दुसरे दिवशीं एकांतीं बोलणें झालें. प्रसंग पाहून चंद्रराव व सूर्याजीराव दोन्हीं भावास कट्यारीचे वार चालविले. पाठीवर लाग झाला त्यास मारून निघून चालले. खासाच पडला लोक काय चालून येतात ? असें कर्म करून राजास भेटले तोंच राजा चालून जाऊन जावळी सर केली. प्रतापगड नांवाचा किल्ला बसविला. हणमंतराव म्हणून चंद्ररावाचा भाऊ होता तो चतुर्बेट म्हणून जागा तेथें बळ धरून राहिला. त्यास मारल्याविना जावळीचें राज्य सुटत नाहीं, असें जाणून संभाजी भावजी म्हणून महालदार राजयाचा होता त्यास हणमंतरावाकडे पाठवून सोइरिकीचें नातें लावून एकान्तीं बोलाचालीस जाऊन संभाजी कावजी याणें हणमंतरावाशीं कट्यारीनें वार चालवून जिवें मारलें, जावळी काबीज केली." (सभासद आवृति ४ साने पा ७)

या पुराव्याचें परीक्षण करतांना प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं सभासद हा हें वृत्त प्रत्यक्ष पाहणारा नाहीं किंवा त्या वृत्तांशीं कोणत्याहि प्रकारें संबद्ध नाहीं. तो एक शिवाजीच्या राज्याखालीं अंमलदार होता. पुढें जिंजीस राजारामसहाराज होते त्यांचे जवळ असतां त्यांच्या आज्ञेवरुन या वृत्तानंतर सुमारें पन्नास वर्षांनीं ही हकीकत ऐकीव लिहीत आहे. तेव्हां ती तशीच असेल हें निश्चित नाहीं. पण आश्चर्य हें कीं, तो जशी सांगतो तशी सुद्धां हकीकत जदुनाथ देत नाहींत. "चंद्रराव मोऱ्याच्या मुलीच्या लग्नाचें वरकरणी बोलणें बोलण्यासाठीं रघुनाथ बल्लाळ कोरडे हा ब्राह्मण गेला. आणि हिंदु विवाहाच्या

अनेक भानगडींच्या गोष्टी सांगत असतां त्यानें एकाएकीं चंद्रराव मोऱ्यावर कट्यार चालवून त्यास ठार केलें, आणि सूर्यरावास एका मराठा शिपायानें मारलें" असें जदुनाथ लिहितात (शिवाजी पा.५२) त्यास वरील सभासदाच्या बखरींत तरी मुळींच आधार नाहीं. सभासद चंद्ररावाशीं "तह रद्द" करण्याच्या मिषानें गेला असें स्पष्ट लिहितो. मुलगी मागण्याचा मुळींच उल्लेख करीत नाहीं हें वाचकांनीं लक्षांत घ्यावें. अर्थात् त्यांचीं बोलणीं राजकारणाचीं होतीं. दुसऱ्या एका बखरींत लिहिल्याप्रमाणें चंद्रराव मोऱ्यानें आपणास राजा न म्हणवितां शिवाजी राजा आहे असें मान्य करावें आणि विजापूरकरांची नोकरी व गुलामी न करितां स्वराज्यसंस्थापक शिवाजीची नोकरी करावी अशाच प्रकारचें हें बोलणें असलें पाहिजे हें उघड दिसतें. यानंतर मारामारी कशी झाली याचा विचार करतां चंद्रराव मोरे आणि सूर्याजीराव यांजवर रघुनाथ बल्लाळ कोरडे यानें वार चालविला असें सभासद लिहितो तें मान्य करवत नाहीं. एकान्तांत तिघेच होते असें दिसतें. आणि तेंच संभवनीय आहे. रघुनाथ बल्लाळचा एक मराठा शिपाई बरोबर असणें शक्य नाहीं; आणि दोघांवर एकट्यानें कट्यार चालविणें आणि तें इतकें कीं, एक ठार व दुसरा घायाळ शक्य नाहीं. चंद्रराव मोरे दारुबाज उन्मत्त होता; त्यानें शिवाजीचा संदेश तुच्छ मानला "आम्ही कदीमी राजे तुम्हास राजे केलें कोणी ? बादशाहीचे आम्ही स्वामिभक्त ( loyal )नोकर तुमच्या अशा या राजद्रोहाच्या गोष्टी चालणार नाहींत" वगैरे त्यानें उत्तरें दिलीं असें एका बखरींत ( गुप्ते ) स्पष्ट आहे. या प्रकारच्या जबाबाला रघुनाथ बल्लाळनेंहि सणसणीत उत्तरें दिलीं असावीं आणि कज्जा सुरू होऊन रघुनाथ तेथोन बाहेर पडला असावा. त्याचा पाठलाग सूर्यराव यानें केला असतां रघुनाथ बल्लाळचीं माणसें यांची व त्यांची मारामारी झाली असली पाहिजे व त्यांत सर्याजीराव मारला गेला असला पाहिजे. प्रथम लाग झाला असें सभासद लिहितो आणि पुन्हा "मालक मेला लाग कोण करतो" असेंहि लिहितो, हें विरोधी आहे. त्याचा परिहार असा दिसतो कीं प्रथम रघुनाथ बल्लाळ बाचाबाची करून निघोन चालला तेव्हां लाग झाला तो सूर्याजीरावानें केला, पण पुढें तो रस्त्यांत झालेल्या मारामारींत जेव्हां पडला तेव्हां मारा बंद पडून रघुनाथरावास आपल्या माण

सांसह जावळीबाहेर पडतां आलें. शिवाजी फौजेनिशीं जवळ येऊन पोंचलाच होता. त्यानें रघुनाथानें दिलेली खबर व माहिती ऐकून जावळीवर लागलीच हल्ला केला. तेव्हां गैरतयारीच्या स्थितींत हल्ला झाला तरी चंद्रराव मोरे बाहेर आपल्या माणसांनिशीं आला आणि लढाई होऊन मारला गेला, अशीच हकीकत खरी दिसते आणि तीच शिवदिग्विजयांत दिली आहे, हें आपण पुढें पाहूं.

सभासदाच्या बखरींत चंद्ररावमोऱ्याशीं मुलीच्या लग्नाचें बोलणें मुळींच नसून तें पुढील बखरकारांनीं आपल्या कल्पनेंतून काढलें आणि जदुनाथांनीं केवळ पूर्वदूषित ग्रहानें छाननी केल्याशिवाय घेतलें हें उघड आहे. आतां सभासद रघुनाथ बल्लाळनें प्रथम कट्यार अचानक चालविल्याचें लिहितो हें जरी खरें आहे तरी वर दर्शविल्याप्रमाणें तें चुकीचें असून छानून घेतलें पाहिजे. ही गोष्ट अशी नसावी, वर सांगितल्याप्रमाणेंच असावी असें मानण्यास आणखी एक सबळ कारण असें दिसतें कीं ही अतिशयोक्ति आश्चर्यकारक आहे. चंद्रराव मोऱ्यास लग्नाचें बोलणें बोलण्याचें मिष करून रघुनाथ बल्लाळनें विश्वासघातानें मारलें आणि जावळी घेतल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्याचा अधिकारी हणमन्तराव चतुर्बेट येथें जमाव धरून बसला व विरोध करूं लागला त्यासहि शंभूजी कावजी यास शिवाजीनें सोयरिकीचे बोलण्याचें मिष करून पाठवून पुन्हा एकान्तांत गांठवून दग्यानें मारविलें असें सभासद लिहितो आणि जदुनाथहि नक्कल करून तसेंच लिहितात. ( पान ५३ ) विचाराची जागा आहे कीं थोड्याच दिवसांपूर्वी चंद्ररावास रघुनाथानें दग्यानें मारला हें हणमंतरावास ठाऊक असलेंच पाहिजे. तो त्याचा कारभारी होता आणि त्याच्यासाठीं त्याच्या मरणोत्तर झगडत होता. त्यानेंहि शिवाजीच्या त्याच युक्तीस फसून शंभूजी कावजी याच्या कट्यारीस बळी पडावें हें आश्चर्य नव्हे काय? दोघांवर थोड्याच दिवसांच्या अन्तरानें एकच युक्ति कशी चालेल? हणमंतराव शंभूजी कावजी यास प्रथमच धुडकावून लावता आणि सोयरिकीचे ( येथें सभासदाच्या लिहिण्यांत चंद्रराव मोऱ्याच्या मुलीचा संबंध नसून शंभूजी कावजी याचाच खुद्द हणमंतरावाशीं सोइर संबंध दिसतो ) त्यानें शंभूजीस एकान्तांत भेटताच तर त्यास हत्याररहित करून भेटता. तात्पर्य हा एकच प्रयोग एकामागून एक थोड्याच

अवकाशानें दोघांवर चालणें शक्य नाहीं; आणि ही सभासदानें अतिशयोक्ति केलेली आहे. सभासदाच्या लिहिण्यांत जागजागीं गैर माहितीचीं विधानें तर आहेतच पण अतिशयोक्त्याहि आहेत. अफझलखानानें तुळजापुरच्या भवानीस जात्यांत भरडली वगैरे चुकीचीं विधानें आहेत. शिवाय मोंगलाचें सैन्य कौरवांच्या सैन्यासारखें असून दोन गांवाइतकें पडत असे वगैरे अतीशयोक्तीचे प्रकार त्याच्या लिहिण्यांत आहेत. खरोखर पाहतां चंद्रराव मोरे यास दग्यानें मारविलें नसलें पाहिजे तरच हणमंतराव दग्याला बळी पडूं शकेल हें उघड आहे. आणि या दृष्टीनें पाहतां सभासदानें ऐकीव लिलिलेली हकीकत चुकीची व अतिशयोक्तीची द्विरुक्ति आहे × असें उघड विचाराअन्तीं दिसतें.

शेडगांवकराची बखर या सभासदाचीच बहुतेक नक्कल करीत आहे. त्यांतहि चंद्ररावाच्या मुलीच्या लग्नाची गोष्ट मुळींच लिहिलेली नाहीं. रघुनाथ बल्लाळ हेजीबीस गेला असेंच लिहिलें आहे अर्थात् तो पोलिटिकल वकीलीस

---

× सभासद शिवाजी तर्फे लिहीत असला तरी अतिशयोक्तीच्या मोहास बळी पडतो असें स्पष्ट दिसतें. बखरकारांचा मोठा दोष म्हणजे अतिशयोक्तीला बळी पडणें हा होय. अफजलखान विजापुराहून निघाला तेव्हां त्यानें आपल्या त्रेसष्ट बायकांस पाण्यांत ढकलून मारलें आणि नंतर तो निघाला असें कित्येक बखरकार लिहितात; व रा. भावे हेहि हीच गोष्ट टिपेंत मान्य करतात. ( अफझलखानाचा वध टीप पान ८ ) आणि एक फ्रेंच लेखकाचाहि आधार देतात आणि अफझलखानाच्या त्रेसष्ट बिब्यांच्या थडग्यांचाहि उल्लेख करून प्रत्यक्ष पाहिल्याचें सांगतात. परंतु ही हकीकत धडधडीत खोटी असली पाहिजे. अफझलखान केवळ आत्मश्लाघेच्या धुंदींत निघाला होता फाजील आत्मविश्वासानेंच तो पडला, मी मरेन असें त्याच्या कधींच स्वप्नांत आलें नाहीं " कोन्योऽस्ति सदृशो मया " " असौ मया, हत शत्रः चापरानहि " अशा असुरीभावाचा होता. तो आपल्या बायकांस कशास मारतो. आणि तो काय रजपूत होता? आणि बायकांची शाका करून केशरी रंगाचे कपडे करून मरायला थोडाच चालला होता? आणि बायका ६३ " सगळीच अतिशयोक्ति. इतिहासकारांनीं अशा अतिशयोक्त्या ओळखून बाजूस सारल्या पाहिजेत.

गेला होता. तसेंच चंद्रराव, सूर्यराव व रघुनाथ बल्लाळ हेजिब त्रिवर्ग एकान्तांत जाऊन बसले असेंच त्यांत लिहिलें आहे. मग येथें पुढील वाक्य कसें जुळेल? "कांहीं शिपाई लगत उभे होते." हें लिहिणें अर्थात् चुकीचें. खरें असलें तर दोघांचेहि शिपाई असले पाहिजेत. हें उघड आहे आणि हेजीब यानें प्रथम चंद्ररावावर कट्यारीचा वार चालविला" हें संभवत नाहीं हा बखरकार आणि शिपाई यानें ( रघुनाथ यानें नव्हे ) सूर्यरावावर वार केला असें लिहितो, पण तेंही संभवत नाहीं. असो याच्या पुढच्या हकीकतींत म्हणजे हणमंतराव याचे हकीकतींत शब्द सोयरीकीचें नातें एवढाच तो वापरतो. चंद्रराव मोऱ्याची मुलगी शिवाजीस देण्याबद्दल शब्द नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. तात्पर्य, या हकीकतींतला आधार सभासदाचाच दिसतो आणि येथें तीच अतिशयोक्तीची चूक आहे. चंद्रराव आणि हणमंतराव दोघेहि एकाच युक्तीच्या दग्यास बळी पडूं शकत नाहींत, यासाठीं चंद्रराव मोऱ्याचा खून दग्यानें झाला नाहीं असेंच ठरवावें लागतें.

या बखरींतील पुढचें एक विधान महत्त्वाचें आहे. चंद्ररावास घरभाऊ बारा होते त्यांस कांहींएक न देतां चंद्रराव एकटाच जबरीनें राज्य खात होता. हे घरभेदे होऊन शिवाजीकडे मिळाले व त्यांनीं शिवाजीस मिळून राज्य बुडविलें. तेव्हांपासून म्हण पडली कीं, "बाराभाई बुडविली चंद्रराई". याबद्दल दुसऱ्या एका बखरींत असें लिहिलेलें आढळतें कीं हे भाऊबंद दोघे होते, त्यांचीं वतनें चंद्ररावानें खालसा केलीं होतीं, ते शिवाजीकडे मिळालेले होते व त्यांस शिवाजीनें जावळी खालसा केली तेव्हां त्यांचीं वतनें परत दिलीं. अशा प्रकारचें सरळ व राजनीतीस अनुसरून शिवाजीमहाराजांचें वर्तन असतां ठाण्याचे राजश्री भावे लिहितात कीं "शिवाजीनें थोडेच दिवसांनीं बाजीराव मोरे व कृष्णराव मोरे या चंद्रराव मोऱ्याच्या भावांस बोलावून आणून त्यांचा शिरच्छेद केला. इतकेंच नव्हे तर मोऱ्यांच्या घराण्याचें दूरदूरचें मनुष्य मारून टाकलें. या घराण्यांतील लहान लहान नेणतीं मुलें मारून टाकलीं व कुटुंब धुळीस मिळविलें. शिवाजीच्या वेळच्या या कत्तलीचें वर्णनें अझूनहि जावळी प्रांतांतले लोक सांगतात. मोऱ्यांचे कांहीं पुरुष जीव बचावून राहिले. ज्यांच्या ज्यांच्याकडे लपून राहिले त्यांचीं नांवें त्यांनीं

घेतलीं " असलें भेसूर चित्र भ्रमानें भावे 'अफझलखानाचा' वध पृ. १ यावर काढतात पण त्यांत तथ्यांश मुळींच नाहीं. असल्या प्रचलित दंतकथा नेहमीं तपासून घेतल्या पाहिजेत. मोऱ्यांचे बारा भाऊ शिवाजीनें बचावले आणि आपल्या पदरीं अन्नास लाविले असें भाव्यांनींच प्रसिद्ध केलेल्या शेडगांव-कर बखरींत वर लिहिल्याप्रमाणें आहे. तें भावे कसे विसरले? आणि इतक्या मोऱ्यांचा नायनाट करण्याची सूडवजा इच्छा असण्याइतका कोणता प्रसंग शिवाजीवर चंद्ररावानें आणला होता? परशुरामानें निःक्षत्रीय पृथ्वी कर-ण्याचा पण बापाच्या वधामुळें चिडून केला तसा शिवाजीचा कोणताहि भयंकर अपराध मोऱ्यांनीं केला नव्हता. अलबत्ता जे मोरे शिवाजीच्या आड येऊन त्याच्या विरुद्ध लढले ते मारले गेले हें न्याय्यच आहे. कंस मारला गेला त्याबरोबर त्याचा बंधु सुनामा यानें हात उठविला तेव्हां तोहि मारला गेला. त्याचप्रमाणें या कज्यांत सूर्याजीराव आणि कांहीं इतर मोरे मारले जाणें शक्य आहे व तें राजनीतीस व न्यायास धरून आहे. आतां स्थानिक दंतकथा कोठल्या तरी कार्डीचा आधार घेऊन बनत असतात त्यांस इतिहास मानतां येत नाहीं. परशुरामाच्या क्षत्रिय कत्तलीचा आधार घेऊन चांद्रसेनी कायस्थ प्रभु आपल्या मूळ पुरुषाची एक हकी-कत अशाच प्रकारची सांगतात. या सर्व कल्पना होत, इतिहास नव्हे. आणि अशा दंतकथा हल्लीं प्रचलित असल्या तरी बाराभाई । बुडविली चंद-राई । ही दंतकथात्मक म्हण त्याहून जुनी आणि त्याच्या विरुद्ध असतांना शिवाजीमहाराजांवर असा क्रूर सूडाचा आरोप घेणें केवळ चुकीचें आहे. मुसलमानांकडील सरदार किंवा मोठीं माणसें लढाईंत पाडाव होत. त्यांस सुद्धां शिवाजीनें कधीं मारलें नाहीं. किंबहुना कैदेंत ठेवलें नाहीं. उलट गौरव करून नेहमीं परत पाठवून दिलें. अशीं वर्णनें बखरींतून असतां मोऱ्यांकडील त्यांच्या कुळाच्या माणसांना उगीच्या उगीच ठार मारण्याचें घोर पातक शिवाजी करील असें वाटत नाहीं. तेव्हां सर्व मोऱ्यांचा सूड-वजा नायनाट शिवाजीनें केला असें मानणें म्हणजे भ्रम नव्हे तर काय?

असो, एथवर आपण सभासदाच्या बखरीचें आणि तदनुरोधानें हकीकत देणाऱ्या शेडगांवकराच्या बखरीचें परीक्षण केलें. चंद्रराव मोऱ्याकडे

लग्नाची गोष्ट बोलण्याकरितां रघुनाथ बल्लाळ यास पाठविलें नसून तो हेजिबीस गेला होता असें स्पष्ट या बखरींत आहे. हेजिब म्हणजे ambassador अथवा राजकीय वकील राजकीय बोलाचालीकरितां गेला होता असें वर्णन आहे. याच्या उलट जदुनाथ यांनीं केवळ गैर-समजानें लिहिलें आहे. दुसरें चंद्रराव हेजिब यानें एकान्तांत प्रथम वार चालविला असें दोन्ही बखरींत आहे हें खरें. पण ही गोष्ट पुढील वर्णना-वरून संभवत नाहीं. असें असतें तर हणमन्तराव यास त्याच युक्तीनें दग्यानें मारलें हें कसें संभवेल? तेव्हां चंद्ररावावर दगा झाला नाहीं हेंच गृहीत धरावें लागतें. आतां कित्येक असा आक्षेप घेतील कीं, चंद्ररावाला मारण्याकरितांच रघुनाथ बल्लाळ यास शिवाजीनें पाठविला होता, असें, त्याशीं झालेलें शिवाजीचें पूर्व भाषण या बखरींत दिलेलें आहे याव-रून दिसतें. तेव्हां या भाषणाविषयीं आपणांस अधिक विवेचन करा-वयास पाहिजे.

हें वाक्य येणेंप्रमाणें आहे "विचार करतां चंद्रराव मोरे यास मारल्या विरहित राज्य साधत नाहीं. त्यास तुम्हावांचून हें काम कोणास न होय. तुम्हीं त्याजकडे हेजिबीस जाणें" या वाक्यांत सुद्धां तुम्ही त्याचा दग्यानें खून करा असें म्हण्टलेलें नाहीं. हेजिबीस जा म्हणजे राजकीय गोष्टीची वकिली करण्यास जा असा स्पष्ट अर्थ आहे. तसेंच चंद्ररावास मारल्यावांचून या शब्दांत दग्यानें ठार केल्यवांचून असा अर्थ निघत नाहीं. मारल्यावाचून याचा अर्थ पादाक्रान्त केल्यावाचून एवढाच निघतो. या भाषणाचा अर्थ दुसऱ्या बखरींतील वाक्यांवरून स्पष्ट कळून येईल. रा. भावे, गुप्ते संपादित बखरीच्या आधारें या वकिलीचें जास्त स्पष्टीकरण करतात. "तुम्ही मुस्तफद राजे म्हणवितां.त्यास राजे आम्ही—आम्हांस श्री शंभूनें राज्य दिधलें आहे. तरी तुम्ही राजे न म्हणावें आमचे नोकर होऊन मुलुख खाऊन हमरहा चाकरी करावी. जावळी खाली करून- राजे न म्हणून-मोरचेल दूर करून-रुमालें हात बांधून भेटीस येऊन हुजूरची कांहीं चाकरी करणें. इतकियावर बदफैली केलिया "**मारले जाल**" भाषणाचे शेवटीं मारले जाल हा शब्द आहे त्याचा अर्थ तुमचा नाश होईल एवढाच आहे. तात्पर्य या भाषणाचा विचार करतां सुद्धां शिवाजीनें रघुनाथ

मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद नं. ...... स.नि. ११०

सं.नि.

बल्लाळ यास चंद्रराव मोऱ्याचा एकान्तीं दग्यानें खून कर अशी मसलत दिली नव्हती. हें कार्य तुमच्यावांचून इतरास होणें नाहीं याचा मतलब एवढाच, असा निर्वाणीचा राज्य खालसा करून देण्याचा निरोप सांगणारा वकील मनानें बुद्धीनें आणि शरीरानें अगदीं सारखा खंबीर असला पाहिजे हें उघड आहे. त्यांत चंद्रराव दारुबाज उन्मत्त मनुष्य आणि त्यास असा संदेश सांगावयाचा तेव्हां कोणी स्पष्टवक्ता असून क्षत्रियवृत्तीचा असा ब्राह्मणच पाहिजे होता हें उघड आहे. जदुनाथ ब्राह्मण ही रघुनाथाची जात कुत्सित बुद्धीनें सांगतात पण ब्राह्मण पाठविण्याचें कारण वर प्रमाणें आहे आणि अशा दौत्य प्रसंगीं पुराणांतून सुद्धां ब्राह्मणच प्रथम पाठविल्याचीं उदाहरणें सांपडतील.

पण शिवाजीनें असा निरोप तरी कां पाठवावा आणि चंद्ररावाचें राज्य हरण करून त्यास कां मारावें असा एक तात्विक नीतीचा प्रश्न येथें कित्येक इतिहासकार उपस्थित करतात. रा. भावे 'हाच काय तो मोऱ्याचा अपराध'? एवढेंच म्हणून या प्रश्नाचा जास्त ऊहापोह करीत नाहींत. पण जदुनाथ सरकार या ठिकाणीं म्हणतात "The acquisition of Javli was the result of deliberate murder and organised treachery. जावळी हस्तगत करणें हें जाणून बुजून खून आणि पूर्व तयारी केलेला विश्वासघात यांनीं शिवाजीनें साधिलें. व पुढें शेवटीं "Even Shivaji did not pretend that the murder of the three Mores was prompted by a desire to found a Hindu Swaraj'

"शिवाजी सुद्धां असें भासवीत नाहीं किंवा म्हणत नाहीं कीं या तीन मोऱ्यांचा खून हिंदु स्वराज्य स्थापनेच्या इच्छेनें प्रेरित होता." असा शिवाजीच्याहि मताचा आश्रय घेण्यास आधार काय हें जदुनाथ सरकार यांनीं येथें दिलें नाहीं. सभासद तर चंद्ररावास मारल्याशिवाय राज्य साधत नाहीं असें स्पष्ट लिहितो. असो, योग्य स्वाभिमानरहित दृष्टीनें स्वदेशाचा इतिहास लिहिणारे हे स्वदेशी इतिहासकार या वधास खून असा शब्द लावून तो स्वराज्यस्थापनेकरितां सुद्धां नव्हता असें जें मत प्रतिपादन करितात त्याचा आपण विचार करूं

राजनीतीच्या दृष्टीनें एका बलिष्ठ राजानें दुसऱ्या राजावर हल्ला करून त्यास पादाक्रांत करावें या गोष्टीस कधींच असंमत मानलें नाहीं. निदान आतांपर्यंत

तरी मानलें नाहीं हें पाश्चात्य आणि पौर्वात्य सर्व देशांच्या इतिहासावरून दाखवितां येईल. चंद्ररावानें शिवाजीस उत्तर दिल्यांत "तुम्हास राज्य दिलें कोणी? मुस्तफद राजे आपल्या घरीं म्हणटल्यावर कोण मानतो." असा प्रश्न केला आहे. त्याच्या दृष्टीनें विजापुरच्या बादशहानें जसें मोऱ्यांस जावळीचे राजे म्हणटलें त्या प्रमाणें शिवाजीस कोणी बादशहानें राज्य दिलें पाहिजे होतें. पण मुसलमानी बादशहांस तरी राज्य कोणी दिलें? त्यांनीं जबरदस्तीनें हिंदूंचें राज्य घेतलें म्हणूनच राजे झाले ना? आणि इंग्रजांनां तरी राज्य कोणी दिलें?हिंदुस्थानांत इंग्रजांनीं राज्य स्थापन केलें तें कोणत्या न्यायानें आणि हक्कानें? जबरदस्तीच्या हक्कानें; किंवा पूर्वींचे राजे मुसलमान व हिंदु समजत त्याप्रमाणें परमेश्वराच्या कृपेनें. आणि परमेश्वराची ही कृपा लढाईत जय देणें याच मार्गानें व्यक्त होतें, बखरखार नेहमीं 'खुदानें मुसलमानांची बादशाही काढ़न मराठ्यांस दिली' असेंच दिल्ली विजापूर इत्यादि बादशहांचे उद्गार लिहितात. तात्पर्य, ज्यांस सामर्थ्य असेल त्यानें राज्य स्थापावें हाच राजनीतीचा सिद्धान्त आणि याच सिद्धान्तास अनुसरून शिवाजीचा चंद्रराव मोऱ्यास निरोप होता. शिवाजीच्या चरित्रावर महाभारताच्या कथेची छाप ठिकठिकाणीं दिसते आणि महाभारताची शौर्यवीर्य गुणांना प्रोत्साहन करणारी कथा शिवाजी महाराज नेहमीं ऐकत असें प्रसिद्ध आहे हें जदुनाथ सरकारहि मान्य करतात. हा प्रसंग जरासंधवधासारखा स्पष्ट दिसतो. शाईस्तेखानावर हल्ला केल्याचा प्रसंग अश्वत्थाम्याच्या छाप्यासारखा दिसतो किंबहुना त्यावरूनच कल्पना शिवाजीला आली असावी. पांडवसेना कौरवांच्या तळावरील सर्व माल काबीज करून तेथें श्रान्त निद्रिस्त झाली होती. त्याप्रमाणें शाईस्तेखान पुण्याचा कबजा करून शिवाजीच्या वाड्यांत उतरला होता. अश्वत्थाम्यानें सर्व वाटा ठाऊक असल्यानें आपल्या वीर्यावर विश्वास टाकून बेधडक जसा पांडवांवर छापा घातला तसा शिवाजीस सर्व पुण्याच्या वाटा माहीत असल्यानें अश्वत्थाम्यासारखाच तो धाडसी शूर वीर असल्यानें त्यानें शाहिस्तेखानावर रात्रीं छापा टाकला असें स्पष्ट दिसतें. असो, चंद्रराव मोऱ्याच्या प्रकरणांत ही महाभारतांतील जरासंध प्रकरणाची प्रतिकृति दिसते. कृष्णानें पांडवांस सांगितलें " जरासंधास मारल्यावांचून तुम्हास राजसूययज्ञ करणें शक्य नाहीं. " जरासंध यावेळीं हिंदुस्थानचा सार्वभौम होता; वास्तविक पाहिलें तर

पांडवांस जरासंधाचें सार्वभौमत्व काढून आपल्याकडे घेण्याचा अधिकार काय ? उत्तर हेंच कीं, जबरदस्तीचा. जरासंधाहून जर आम्हीं प्रबळ आहों तर आम्ही सार्वभौम. हाच अधिकार हिंदुस्थानांत इंग्रजी राज्याचा आणि मुसलमानी राज्याचा. याच अधिकारानें कृष्णानें जरासंधास मारण्याची सल्ला दिली. पण ती खुनाच्या रीतीनें नव्हे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. प्रसिद्धपणें आणि स्पष्टपणें कृष्णानें भीमार्जुनासह जाऊन त्यास सांगितलें: " राजे व क्षत्रिय कैदेंत घातले आहेत ते सोड ( अर्थात् सार्वभौमत्व सोड आणि आमचा हुकूम मान ) नाहीं तर युद्धास उभा रहा " ह्याच प्रकारचा निरोप अथवा राजकीय संदेश शिवाजीनें चंद्रराव मोऱ्यास पाठविला. राजा मी आहें तूं माझें अंकितत्व कबूल करून जावळी सोड; बाकी राज्य खा ( त्यास केवळ नंगा करण्याचा विचार कधींहि शिवाजीचा नव्हता आणि मान्य राज्यनीतींत नसतो ). नाहीं तर, युद्धास उभा रहा माझ्यांत सामर्थ्य आहे. श्री शंभूनें मला राज्य दिलें आहे. त्याच्या कृपेनें तुला मारीन असा हा निरोप होता. आजपर्यंतच्या राजनीतीच्या कल्पनेनुरूप यांत वावगें कांहींच नव्हतें आणि यास विश्वासघातादि शब्द लावतां येत नाहींत जावळी खाली करण्याचें एक कारण असेंहि दिसतें कीं, जावळीवरून शिवाजीवर बाजी शामराज याणें विजापूरची फौज घेऊन पूर्वीं स्वारी केली होती. ती सिद्धीस गेली नाहीं हें जरी खरें तरी जावळी कोंकण राज्याच्या वाटेवर; शिवाजीच्या ताब्यांत असलीच पाहिजे. इंग्रजांनीं अफगाणिस्थानवर स्वारी करण्याकरितां सिंधच्या अमीरांच्या राज्यांतून रस्ता मागितला असतां या सिंधअमीरांनीं रस्ता दिला नाहीं. येवढ्याच करितां इंग्रजांनीं अमीराचें सिंधचें राज्य खालसा केलें हें इतिहासप्रसिद्ध आहे.

असो तर, बलहीनास बलिष्ठांनीं खावें हा न्याय राजनीतींत आजपर्यंत पाश्चात्य व पौर्वात्य देशांत सर्वत्र मान्य झालेला आहे आणि त्यास अनुसरूनच इंग्रजांचें व मुसलमानांचें राज्य हिंदुस्थानांत झालेलें आहे. अर्थात् शिवाजीनें जावळीचें राज्य खालसा करून मागितलें हें आजपर्यंच्या राजनीतीस धरून होतें. यापुढें मात्र जगतांत हा सिद्धान्त कायम राहिला नाहीं हें येथें सांगितलें पाहिजे. यापुढें जगतांत राजेच नाहींसे होणार आहेत मग राजनीति व राज्य हे शब्द तरी कोठून राहणार ? राज्याचे मालक अथवा खऱ्या शब्दांनीं

बोलावयाचें तर शासन सत्तेचे मालक लोक आहेत; आणि एखाद्या विवक्षित देशांत कांहीं विशिष्ट तऱ्हेनें संबद्ध असलेले लोक राहतात त्या देशांतील शासनाचा अधिकार त्या लोकांचा आहे. अशा स्वयंशासित लोकांवर कोणत्याहि दुसऱ्या लोकांनीं हल्ला करून आपली शासनसत्ता स्थापन करूं नये. बळाच्या सामर्थ्यावर असें कोणी करील तर तो अन्याय आहे, असेंच मानलें जाईल. जर्मनीनें बळाच्या जोरावर बेलजम खाण्याचा प्रयत्न केला किंवा आस्ट्रियानें गहर्जेगोव्हिना खाल्ला तेव्हां युरोपभर युद्ध पसरलें आणि परमेश्वरानें फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका यांस जय दिला तेव्हांपासून हा सिद्धांत प्रस्थापित झाला आहे. स्वयंशासित लोकांस दुसऱ्या कोणीहि जिंकून अंकित करूं नये असा हा हल्लींचा सिद्धान्त असून त्याचाच विजय तुर्कांच्या बाबतींत नुकताच झाला आहे आणि लवकरच आरबांच्या बाबतींतहि होईल. हिंदुस्थानच्या बाबतींत मात्र याची प्रचीती येण्यास काळ लागेल. तथापि येथेंहि ती प्रतीति आल्याशिवाय रहाणार नाहीं. पण हा हल्लींचा न्याय आहे याचा संबंध शिवाजीच्या कारवाईच्या नितिमत्तेच्या विचाराशीं लावतां येत नाहीं. आजपर्यंत चालत आलेल्या राजनीतीच्या तत्त्वांचा विचार करतां शिवाजीनें आपलें सामर्थ्य पाहून जावळीचें राज्य खालसा करून मागितलें यांत त्यानें त्याकाळीं सर्वत्र जी राजनीति प्रचलित होती, तिचाच अवलंब केला.

शिवाजीच्या या मागणीस राजनीतीच्या अजूनही प्रचलित असलेल्या तत्वाचा आणखी आधार आहे असें म्हणतां येतें. शिवाजीनें स्थापन केलेल्या कोंकण व घाटमाथ्यावरील लहानशा राज्यास जावळीचें राज्य अगदीं लागून होतें आणि तें जर निराळें राहून विजापुराखालीं राहतें तर शिवाजीचें राज्य कधींच टिकलें नसतें. सभासदानें दिलेल्या शिवाजीच्या विचारांत पहिलेंच वाक्य असें आहे "चंद्रराव मोरे यास मारल्या विरहित राज्य साधत नाहीं." शिवाजीच्या राज्याचें अस्तित्वच चंद्रावमोऱ्याचें राज्य मारल्याशिवाय कायम रहात नव्हतें. Self preservation स्वसंरक्षण हें एक महत्त्वाचें अंग राजनीतींत अजून आहे. इंग्लंदनें आयर्लंदवर जो ताबा अजून चालविला आहे तो याच तत्वावर. आयर्लंद जर स्वतंत्र असेल तर इंग्लंदवर जल मार्गानें स्वारी करण्यास फारच सोपें आहे ही गोष्ट निर्विवाद आहे आणि म्हणूनच हजारों माणसें बळी देऊन

सुद्धां व लोकांच्या मागणीस न जुमानतां इंग्लंदनें आपला कबजा मुख्य मुख्य बाबींत विशेषतः आरमारी बाबींत आयर्लंदवर कायम ठेवला आहे. हें करणें राजनीतीच्या हल्लींच्या दृष्टीनेंहि अन्याय्य म्हणतां येणार नाहीं. मग शिवाजीनें तरी जास्त काय मागितलें ? जावळीचें राज्य तुम्ही खा पण आमच्या अंकित रहा आणि नाकेबंदीची जागा जावळी आमच्या स्वाधीन करा असेंच तो मागत होता. हें मागणें आणि इंग्लंदचें आयर्लंदपाशीं मागणें यांत शासन शास्त्राच्या दृष्टीनें कांडीइतकें अंतर नाहीं आणि इंग्लंदनें जर आयर्लंदवर हल्लींच्या शासनशास्त्राच्या नवीन मनूंतसुद्धां कबजा आद्याप ठेवला आहे तर शिवाजीनें जावळीवर कबजा मागितला आणि तो चंद्ररावानें मान्य न केला म्हणून त्याजवर हल्ला केला यांत नवीन मनूप्रमाणें सुद्धां कांहीं दूषणार्ह नाहीं असेंच म्हण्टलें पाहिजे.

पण याहीपेक्षां अधिक महत्वाच्या हक्कावर स्थापन झालेलें असें हें शिवाजीचें कृत्य असून तें दूषणीय नव्हतें इतकेंच नव्हे तर तें उदात्त आणि वंदनीय होतें, असेंच राजकीय घडामोडींचा निर्विकार मनानें तात्विक विचार करणारे म्हणतील अशी खात्री आहे. शिवाजीचा उपक्रम नुसता राज्यस्थापनेचा नसून स्वराज्यस्थापनेचा होता महाराष्ट्रास पारतंत्र्यांतून काढून स्वतंत्र स्वराज्यांत आणण्याचा होता ही गोष्ट जदुनाथ सरकारसारख्या जन्मान्ध इतिहासकाराच्या दृष्टीस येत नसली तरी ती झांकून ठेवतां येण्यासारखी नाहीं.जदुनाथ जे Even Shivaji did not pretend that the murder of the three Mores was prompted by a desire to found a Hindu Swaraj असें लिहितात त्यास आधार नसून तें खात्रीनें कल्पित आहे. शिवाजीस स्वराज्यस्थापनेची कल्पना आरंभापासून असावी असेंच दिसतें. वरील सभासदाच्या वाक्यांत जरी "राज्य साधत नाहीं" असा शब्द आहे तरी राज्य म्हणजे स्वराज्य हीच कल्पना त्यावेळीं होती हें उघड आहे. शिवाजीचे सर्व स्नेही व मंत्री स्वराज्य म्हणजे हिंदुधर्माचें व हिंदुराजांचें राज्य स्थापन करण्याच्या उच्च भावनेनेंच उद्दीपित झालेले होते आणि प्रसंगीं हाच विचार त्यांस जास्त पराक्रम व स्वार्थत्याग करण्यास प्रवृत्त करी हें मान्य करावें लागेल. जदुनाथ सरकार मोंगलांचे इतिहासकार त्यांस या शिवाजीच्या कृत्यासंबंधें शीरशहाचीच आठवण येते. पण

शीरशहा हा कांहीं स्वराज्य स्थापन करीत नव्हता. तो एक मोंगलांचा नोकर बेईमान होऊन केवळ बळी तो कानपिळी या न्यायाचा अवलंब करून दंग्यानें खून करण्यास प्रवृत्त झाला होता अर्थात् त्याचें कृत्य तत्कालीन राजनीतीच्याहि दृष्टीनें न्यायास अनुसरून नव्हतें. आणि शिवाजीनें चंद्ररावास स्पष्टपणें निरोप पाठविला तसा शीरशहानें दक्षिण बिहारांत किल्ले काबीज करतांना पाठविला नव्हता. तात्पर्य शिवाजीचें कृत्य शीरशहाच्या कृत्याहून किती तरी ज्यास्त उदात्त होतें! आणि तें स्वराज्य साधनाच्या उद्योगांत झालेलें असल्यानें अधिकच प्रशस्त व वन्दनीय आहे असें चिकित्सकांस मान्य करावें लागेल. जदुनाथ सरकारांस शीरशहाची आठवण होते पण वाशिंग्टनची होत नाहीं हें साहजिक आहे. पण आपणास वाशिंग्टनची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. शिवाजीनें लहानपणापासून हिंदुधर्माचा छळ चाललेला पाहून स्वराज्य स्थापनेचा व स्वातंत्र्य प्राप्तीचाच निश्चय केला व आपल्या बालसंवगड्यांना याच उदात्त हेतूनें प्रेरित करून आणाभाका वाहून सामिल करून घेतलें आणि या बाबतात दादाजी कोंडदेव व शहाजीराजे यांची सुद्धां सल्ला मान्य केली नाहीं असें चिटणीस बखरींत स्पष्ट लिहिलें आहे. आणि ही उदात्त कल्पना सिद्धीस जाणार नाहीं पण प्रसंसनीय मात्र आहे असेंच त्याच्या वडिलांचें व पालनकर्त्यांचें मत होतें. अशक्य दिसणारे उदात्त विचार सिद्धीस नेण्याची महत्वाकांक्षा धरून "पहिली दौलत संपादिली ती घालविली असें वांट्यास न यावें" असा मॉडरेट बुद्धिवाद दादाजी कोंडदेव यानें केला असतांहि "धर्म वृद्धिंगत करण्यासाठीं प्राण दौलत गेली तरी जावो प्रयत्न करावा" असा निश्चय लहानपणींच ज्या शिवाजी महाराजांनीं केला त्यांचें उदात्त चरित्र नीट न समजल्यानें जदुनाथ सरकार वगैरे इतिहासकार पूर्वविरोधिग्रहामुळें चकतात आणि शिवाजीचा विचार प्रारंभींपासून स्वधर्मयुक्त स्वराज्यस्थापनेचा अर्थात् महाराष्ट्रधर्म कायम करण्याचा होता ही गोष्ट कबूल करीत नाहींत आणि यामुळेंच त्यांस वाशिंग्टनची आठवण न होतां शीरशहाची होते. माझ्यामतें हा सुद्दा हल्लीं मुळींच वादग्रस्त नाहीं तत्कालीन लेख जरी मिळाले नसले निदान माझ्या पाहण्यांत नसले तरी शिवाजी महाराजांचा उद्देश प्रारंभापासूनच धर्मरक्षणयुक्त स्वराज्यस्थापनेचा होता आणि हाच स्वराज्य शब्द तेव्हांपासून अस्तित्वांत येऊन पुढें तो राजलेखांत मोंगलाच्या सदनांत किंबहूना हल्लीसुद्धां प्रचलित

झालेला दिसत आहे. अर्थात स्वराज्यस्थापनेच्या उदात्तभावनेनें प्रेरित झालेल्या वीरास मोऱ्यांचें परतंत्र राज्य खालसा करून टाकण्याचा अधिकार जास्तच पोचतो यांत शंका नाहीं.

अशा स्वराज्यस्थापनेस अर्थातच भितरे, आहे त्यास चिकटून बसणारे, हल्लींच्या शद्बांत बोलावयाचें तर मॉडरेट जहागिरदार व राजे प्रतिकूळ असणारच. खुद्द शिवाजीचा बाप प्रतिकूळ होता, मग इतरांची गोष्टच काय? शहाजीस विजापुरच्या बादशहानें कैदेंत टाकलें व त्याच्या जिवावर प्रसंग आणला शिवाजीस रस्त्यावर आणा नाहीं तर तुम्हांस भिंतींत चिणलें जाईल अशी तंबी दिली त्यावेळेस सुद्धां शिवाजी महाराजांनीं एका तागडीच्या परड्यांत वडिलांची मुक्तता आणि दुसऱ्यांत स्वधर्मरक्षण-युक्त स्वराज्यस्थापन हें घातलें असतां वडिलांच्याहि प्राणाची परवा त्यानें ठेविली नाहीं, व "आपल्या दैवीं असेल तसें होईल, आमच्या दैवीं असेल तसें आम्हीं करणार," असें स्पष्ट उत्तर पाठवलें (चिटणीस पा. ३८). तेव्हां वडिलांच्या प्राणाचीहि ज्यानें स्वराज्य स्थापनेसाठीं परवा केली नाहीं तो मोरे यांस तंबी देण्यास कां मागे पुढें पाहील? तात्पर्य या उच्च भावनेच्या दृष्टीनें परकीय अमलास चिकटून राहणाऱ्या मोऱ्यांसारख्या राजांनां आमच्याकडे या नाहीं तर मारले जाल असा निरोप पाठविणें शासनशास्त्राच्या नीतींत अन्यायाचें होणार नाहीं. वाशिंग्टननें जेव्हां स्वातंत्र्य पुकारलें तेव्हां सर्व अमेरिकन संस्थानांना त्यानें याच तत्वानुरूप एकत्र गोवलें, कांहीं संस्थानें स्वतंत्र तर कांहीं इंग्लंडचें पारतंत्र्य कबूल करणारीं अशी स्थिति अमेरिकेंत राहूं शकत नाहीं. किंबहुना या पुढच्या अमेरिकेच्या इतिहासांत असा प्रश्न उपस्थित झाला कीं कित्येक संस्थानें संयुक्तराज्यघटनेंतून निराळीं होऊं लागलीं, तेव्हां त्यांस स्वतंत्र होऊं देणें घातुक आहे, त्यांस तसा अधिकार नाहीं, असेंच तत्व ठरून जबरदस्तीनें लढाई करून संयुक्तांत सामिल करून घेतलें. तेव्हां ज्या अर्थी महाराष्ट्रास पारतंत्र्यांतून काढून महाराष्ट्रधर्म वाढवून स्वराज्यांत आणण्याचा प्रयत्न शिवाजी महाराजांनीं सुरू केला त्याअर्थीं चंद्रराव मोऱ्यासारखीं राज्यें मुसलमानांचें पारतंत्र्य कबूल करून निराळीं राहूं शकत नव्हतीं. त्यांस राजी करून स्वराज्यांत सामिल करून घेणें किंवा त्यांस बुडविणें अर्थात मारणें हेंच न्यायाचें प्रशस्त राजनीतीस धरून होतें. बांदल देशमुख स्वराज्यास अनुकूळ

होईना तेव्हां त्यास मारावेंच लागलें, आणि याच न्यायानें चंद्रराव मोऱ्यास जो निरोप शिवाजीनें पाठविला तो न्याय्य होता.

शासनशास्त्राचें हल्लीं जसें परीक्षण होत आहे आणि पाश्चात्य इतिहासावरून जसे आपण सिद्धान्त न्याय्य अन्याय इत्यादि बाबतींत हल्लीं काढतों तसें पूर्वी कदाचित इकडे काढलेले नसतील, परंतु नीति अनीतीचे ठळक विचार सर्व जगांत नेहमींच एक असतात आणि सर्व लोकांना ते समजतात. शिवाजीला समजत होतें, आणि रामदासांनाहि समजत होतें. मुसलमानांना समजत होतें आणि त्यांच्या मराठे सरदारांना समजत होतें. देशकार्य व धर्मकार्य निघाल्या-वर त्यास विरोधी असतील त्यांस मारणें न्याय्य आहे ही गोष्ट इकडेही सर्व संमत होती आणि तीच रामदासांनीं ' देशद्रोही जितुके कुत्ते मारोनि घालावे परते, ' असें आपल्या खणखणित व सणसणित शब्दांनीं सांगितली. स्वदेश स्वराज्य, स्वधर्म या कल्पना महाराष्ट्रांत तरी यावेळीं मुसलमानांच्या जुलुमामुळें आणि महाराष्ट्रीयांच्या प्राचीनकाळापासून चालत आलेल्या स्वातंत्र्यप्रिय स्वभाव-धर्मामुळें यावेळीं वावरूं लागल्या होत्या, अर्थात् देशद्रोह हा महान अपराध मानला जाऊं लागला होता. देशद्रोही यांस समर्थांनीं कुत्र्याची उपमा दिली आहे ती यथायोग्य हें येथें सांगितलें असतां विषयांतर होणार नाहीं. स्वज-नांशीं विरोध करून परकीयांची म्हणजे मनुष्य–जातीयांची गुलामगिरी करणें हा कुत्र्याचा देहस्वभाव आहे. तेव्हां देशद्रोही हे कुतरे असतात हें समर्थांनीं बरोबरच म्हटलें. मुसलमानांची गुलामगिरी करून स्वराज्य साधावयास प्रवृत्त झालेल्या आपल्या स्वकीयाशीं विरोध करणाऱ्या चंद्रराव मोऱ्यांसारख्यांस मारून टाकणें अवश्य होतें व प्रशस्त राजनीतीस धरून होतें. पण त्यांस प्रथम आपल्या बाजूकडे वळविणें हेंहि कर्तव्यप्राप्त नीतीस धरून होतें. आणि तसाच प्रयत्न नीतिमान शिवाजी महाराजांनीं प्रथम केला असें सर्व बखरकार स्पष्ट सांगतात आणि पाश्चात्य नीतिशास्त्रांतहि हाच मार्ग प्रथम युक्त सांगितला आहे.

येथवर शिवाजीचें कृत्य कसें न्याय होतें याचा तीन दृष्टींनीं विचार झाला. नुसत्या राज्य वाढविण्याच्या इच्छेनें सुद्धां हें कृत्य न्याय्य समजलें जाईल, मग संरक्षणाच्या हेतूनें तर होईलच आणि स्वराज्य–स्वधर्मस्थापनेच्या हेतूनें तर तें उदात्त आणि प्रशस्त मानलें जाईल हें उघड आहे. पण या तिन्ही प्रकारांचा

एक अत्यन्त महत्वाचा भाग आहे, तो वाचकांस नीटपणें समजावून दिला पाहिजे. राज्य वाढविण्याच्या किंवा स्वसंरक्षणाच्या व स्वातंत्र्यस्थापनेच्याहि दृष्टीनें प्रयत्न करून दुसऱ्यावर स्वारी करणें, त्यास मारून त्याचें राज्य खालसा करणें वगैरे गोष्टी न्याय्य समजल्या जाण्यास असा उद्योग स्पष्टपणें राजकीय व्यवहारांत आणि प्रसिद्ध उजागर रीतीनें झाला पाहिजे ही मुख्य अट आहे. राजा राजांत कोणत्याहि प्रकारचा परस्परांस न खाण्याचा उघड किंवा अस्पष्ट करार नसतो पण एकाच राज्यांत राहणाऱ्या व्यक्तींनां अशा प्रकारानें स्वधर्मासाठीं किंवा स्वातंत्र्यासाठीं दुसऱ्यावर झडप घालण्याचा अधिकार नाहीं हें प्राप्त आहे. कारण एका राज्यसत्तेखालीं राहणारे लोक आम्ही आपसांत तंटे मारामारी करणार नाहीं, आपले इनसाफ राजसत्तेसमोर ठेवूं अशा मान्यतेनें बांधलेले असतात. यामुळें असे प्रकार जर कोणी करील तर त्यास चोरी, धाडी खून, इत्यादि अपराधांच्या शिक्षा होतील आणि न झाल्या तरी ते प्रकार चोरी, लूट, खून या शद्बानींच वर्णिले जाऊन निंद्य मानले जातील. राजाराजांच्या संबंधांत अशा प्रकारचा करार साधारणतः नसतो, ते परमेश्वरा-शिवाय दुसऱ्या कोणाकडे आपला इनसाफ नेऊं शकत नाहींत, आणि परमेश्वरा-चा इनसाफ युद्धांत जयापजय याच स्वरुपानें व्यक्त होत असतो. या साठीं अशा राजांच्या कृत्यास खून, लूट इत्यादि खासगी व्यवहारांतले शद्ब लागत नाहींत हें उघड आहे. जेथें तह असतील तेथें तहाचे करार तोडणें अन्यायाचें मानलें जाईल पण इतरत्र हा संबंध केवळ अनियंत्रित असाच आजपर्यंत मानला गेला आहे. अलेक्झांडर आणि चोर यांच्या गोष्टींत असें जरी दाखविलें असलें कीं अलेक्झांडर हा मोठा लुटारु आणि खुनी होता आणि चोर हा लहानशा प्रमा-णावर असतो तरी त्यांत खरें अन्तर वरप्रमाणें आहे. अलेक्झांडरचीं कृत्यें एक राजा या नात्याचीं होतीं आणि सर्व जग जिंकण्याचा निश्चय करून अनेक मुलुखांवर त्यानें स्वाऱ्या केल्या अनेक शहरें लुटलीं आणि हजारों लोक ठार मारले तरी त्याचें कृत्य राजशासनदृष्ट्या अन्याय्य मानलें जाणार नाहीं किंवा दरोडा, खून इत्यादि शद्बांनीं वर्णिलें जाणार नाहीं. ह्या दृष्टीनें पाहतां शिवाजीचा व्यवहार आरंभापासून राजा या स्वरूपाचा होता आणि त्यानें आपण स्वतंत्र राजे आहों ही गोष्ट आरंभापासून व्यक्त केली होती. दादाजी कोंडदेव मरतांच त्यानें सर्व

राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं आणि स्वराज्याची स्थापना केली. राज्याचीं सर्व अंगें त्यानें तात्काळ आस्तित्वांत आणलीं ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. त्यानें अगोदर आपला मुख्य प्रधान नेमून त्यास त्या काळीं दक्षिणेंत मुसलमानी राज्यांत अस्तित्वांत असलेली पेशवे ही पदवी दिली; अर्थात ज्यानें मी स्वतंत्र राजा झालों आहे अशी विजापुरकरास नोटिसच दिली. पेशवा, सरनोबत, सबनीस वगैरे प्रांतिक राज्याचे अधिकारी त्यानें नेमून राजगड येथें आपली राजधानी केली. हा किल्ला नवीन बांधून त्यानें त्याचें नाव राजगड मुद्दाम ठेविलें; तात्पर्य शिवाजीनें प्रथमपासून उघडरीतीनें राजा–स्वतंत्र राजा–हें स्वरूप धारण करून पुढील सर्व व्यवहार राजा या नात्यानें केले. यामुळें त्यास चोर, लुटारू, खुनी इत्यादि विशेषणें लावणें चुकीचें आहे.

शिवाजीच्या या स्वरूपाचें महत्व लक्षांत न आल्यानें कशा चुका होतात तें येथें थोडें विस्तारानें सांगितलें पाहिजे. पुष्कळ अप्रबुद्ध लोक शिवाजीनें लुटीनें द्रव्य मिळवून राज्य स्थापिलें असा भ्रान्त सिद्धांत काढून स्वराज्य स्थापनेसाठीं लुटालूट करणें न्याय्य आहे असें समजतात. इतकेंच नव्हें तर इकडे वासुदेव बळवंत व बंगाल्यांत कांहीं सुशिक्षित तरुण यांनीं लुटालुटी करून आपल्याच स्वदेश बांधवांस त्रस्त केलें हें इतिहासप्रसिद्ध आहे. दोघांचेहि हेतु उदात्त मानले तरी त्यांचीं कृत्यें अश्लाघ्य ठरतात. कारण वर सांगितल्याप्रमाणें त्यांनीं प्रथम इंग्रजांचीं सत्ता उघडपणें झुगारून स्वातंत्र्य पुकारलें पाहिजे होतें आणि मग त्यांचे स्वजन हे परजन झाल्यानें त्यांस लुटण्याचा उपक्रम करावयास पाहिजे होता. शासनशास्त्राचा हा सिद्धान्त अतिशय महत्वाचा आहे. Rebels and decoits यांत जो फरक मानला जातो, तो अशाच स्वरूपाचा आहे. Belligerents म्हणजे स्वातंत्र्याकरितां किंवा स्वराज्याकरितां जे उघड सत्ता झुगारून प्रयत्न करतात त्यांचें कृत्य निराळ्या दृष्टीनें पाहिलें जातें हें नुकतेंच आयर्लंदच्या उदाहरणावरून लक्षांत येईल. डी व्हालेरा यांनें इंग्लंदचें पारतंत्र्य कोणत्याहि बाबींत आम्हीं मान्य करणार नाहीं असा निश्चय जाहीर करून आपलें Republican राज्य निराळें स्थापन करून फौजेची रचना स्वतंत्र राजाप्रमाणें केली आणि लढाई आरंभिली. त्यांत खून केले आणि शेकडों गांवें किंवा कुटुंबें लुटलीं तरी त्याचे साथीदार लुटारू किंवा खुनी मानले न जातां Belligerents

2846



म्हणजे युध्यमान परराष्ट्रीय असेंच इंग्लंडनें मानलें व इंग्लंडला मानावें लागलें हें प्रसिद्ध आहे. कित्येक प्रसंगीं तर आयर्लंडांत डी व्हालेराच्या लोकांनीं दग्यानेंहि खून केल्याचीं वर्णनें आपण वाचलीं आहेत; पण Everything is fair in war and love याला या खालीं हीं कृत्यें Murder या संज्ञेस पात्र होत नाहींत. जदुनाथ सरकारासहि ही जाणीव आहेसें दिसतें; आणि म्हणूनच ते Even Siwaji did not pretend that these murders were necessary for the establishment of Hindu Swaraj असें खोटें आणि चुकीचें विधान ते करतात. चंद्रराव मोऱ्याचा खून दग्यानें केला, असें जरी मानलें तरी सुद्धां स्वराज्यसाधनाच्या उद्योगांत तुम्ही आम्हांस मिळा आम्ही राजे आहों हें कबूल करा अशी नोटिस दिल्यानंतर तो झाला असल्याकारणानें तो खून या शद्बास पात्र होत नाहीं म्हणजे तो खून या दृष्टीनें निंद्य मानला जाणार नाहीं, हें आयर्लंडांतील डी व्हालेरा याच्या हल्लींच्या अनेक कृत्यांवरून आपल्यास स्पष्ट दिसतें. या बाबीचा आणखी जास्त विचार मनोरंजक असून तो येथें देणें जरूर आहे. कोणताही व्यवहार राजकीय स्वरूपाचा असल्यास तो खासगी स्वरूपाहून निराळ्या तत्वाखालीं येतो, त्याचप्रमाणें कोणतीहि गोष्ट युध्यमान राष्ट्रांमध्यें युद्ध सुरू झाल्यास त्याजकडे पाहण्याची दृष्टि निराळी असते. पण Every thing is fair in war हें तत्व लागू होण्यासाठीं War अथवा युद्ध सुरू असलें पाहिजे अन्यशद्बांनीं बोलावयाचें तर त्या राष्ट्रांमध्यें State of war असेल तरच पाहिजेल तें कृत्य त्यावेळीं न्याय्य समजलें जाईल. हल्लीं पाश्चात्य देशांत State of war केव्हां व कशी समजली जाईल याबद्दल पुष्कळ तात्विक विचार केला गेला आहे. लढाई सुरू आहे, अशी परिस्थिति तिकडे बहुधा Declaration of war नें म्हणजे लढाई पुकारल्यानें अस्तित्वांत येते. परंतु एक बारीक तत्व असेंहि ठरलें आहे कीं Formal declaration of war म्हणजे प्रसिद्धपणें लढाई पुकारल्याची जाहीर खबर अन्य राष्ट्रास देण्याची अवश्यकताच आहे असें नाहीं. An act of war म्हणजे लढाईचें एखादें कृत्य एकदम करण्यानेंहि लढाई सुरू करतां येतें असा नियम हल्लीं पाश्चात्य अन्तरराष्ट्रीय व्यवहारांत मान्य झाला आहे. हीं तत्वें सदसद्विवेकास धरून असल्यानें चोहींकडे अमलांत आहेत. प्रत्यक्ष लेखांत आलीं नसलीं

तरी राजनीतींत इकडेहि तींच आमलांत आहेत, हें लक्षांत घेतलें पाहिजे. या तत्वांचा प्रस्तुत प्रकरणांस उपयोग करतां असें स्पष्ट दिसून येतें कीं शिवाजीनें चंद्रराव मोरे यास जो निरोप पाठविला तो Declaration of war च्या स्वरूपाचा होता. त्याजकडे पाठविलेला हेजिब म्हणजे दूत हा राजकीय संदेश घेऊन गेला होता. आणि चंद्रराव मोऱ्यानें हा संदेश अमान्य केला व वकील निघून आला तेव्हांच लढाई सुरू झाली आणि State of war अमलांत आली. असें नसलें तरी सुद्धा शिवाजीनें जावळीवर एकदम हल्ला केला हीच लढाईची सुरवात होती, आणि मग लढाईत यश येण्याकरितां वाटेल ती युक्ती योजणें न्याय्य होतें. किंबहुना प्रत्येक युद्धांत छल म्हणजे फसविणें हें असतेंच. हजारों युद्धप्रसंगाचे इतिहास वाचले असतां ही गोष्ट लक्षांत येईल. वाघ सुद्धां दबा धरून निर्बळ हरिणावर उडी घालतो. बैलाच्या शिंगास जळत्या मशाली बांधून हानिबालनें रोमन फौजेस चकवून भलत्याच बाजूला दवडलें आणि मग त्यांच्यावर पिछाडीवर हल्ला केला. या युद्धच्छलापासून नुकतेंच आयर्लंदमध्यें अनेक छळ करून डी व्हालेराच्या लोकांनीं इंग्रज व विरोधी आयरिश आफिसर व शिपाई कसे ठार मारिले या वृत्तापर्यंत सर्व देशांत हजारों युद्धांत छलाचा उपयोग केला गेला आहे; आणि म्हणूनच Everything is fair in war हें तत्व मान्य झालें आहे. चंद्रराव मोऱ्याचा खून छलानें केला नाहीं ही गोष्ट आम्हीं वर ठरविलेली आहे तरी हणमंतराव मोरे चतुर्बेट येथें जमाव धरून बसला होता त्यास शंभूजी कावजी यानें छळानें मारलें ही गोष्ट आम्हास मान्य आहे पण हा छल युद्ध सुरू झाल्यावरचा असल्यानें क्षम्य असून तो खून या वर्णनाखालीं येऊं शकत नाहीं. शंभुजीनें सोयरिकीचें बोलणें लावून आंत घुसून हा वध केला असें सभासद म्हणतो. येथें सोयरिकी कोणती हा खुलासा नाहीं. याजबद्दल पुढें विवेचन करूं. पण तें चंद्रराव मोऱ्याच्या मुलींच्या मागणीसंबंधें असलें तरी सुद्धां आणि शिवाजीच्या सल्यावरूनहि मानलें तरी युध्यमानस्थितींतील असल्यानें निंद्य ठरत नाहीं. शिवाजीनें याच न्यायानें कित्येक किल्ले छलानें घेतले. किंबहुना कित्येक शहरांवर अचानक छापे घालून तीं शहरें लुटलीं. ह्या सर्व गोष्टी युध्यमान स्थितींतल्या असल्यामुळें निंद्य किंवा दूषणार्ह नाहींत. रॅले वगैरे इंग्रजी जहाजाच्या कप्तानांनीं अमेरिकेहून येणाऱ्या स्पॅ-

निश जहाजावर आचानक हल्ले करून त्यांतलें खंडोगणती सोनें लुटलें आणि फ्रेंचांनी मद्रासवर अचानक हल्ले केले हें प्रसिद्ध आहे. पण या गोष्टी युध्यमान स्थितींतल्या असल्यानें अन्तरराष्ट्रीयनीतीनें मान्य झालेल्या आहेत. मग शिवाजीला तेवढे पाश्चात्य इतिहासकारांनीं लुटारु म्हणावें महंमद गझनीला किंवा रॅले वगैरे इंग्लिश जहाजांच्या कप्तानांनां म्हणूं नये हा केवळ विरोधी भक्तीचा परिणाम आहे. महंमद गझनीनें अशाप्रकारें अचानक हल्ले करून शेंकडों कनोज वगैरें श्रीमंत शहरें लुटलीं पण मुसलमानी इतिहासकारांनीं किंवा इंग्रजी इतिहासकारांनीं त्यांस लुटारु म्हटलें नाहीं. तात्पर्य शत्रूस युद्ध पुकारलें असतां किंवा न पुकारतांहि छलानें किंवा अचानक हल्ल्यानें लुटावें किंवा मारावें ही राजनीति मान्य झाली आहे. आणि याच कारणानें युद्ध सुरू झाल्यावर हणमंतराव मोरे यास छलानें मारलें हीं गोष्ट गैरवाजवी किंवा निंद्य ठरत नाहीं.

युध्यमान स्थितींत सर्व छल क्षम्य आहे. पण एक छल क्षम्य नाहीं, असं मान्य झालेलें दिसतें किंवा करावें लागेल. आम्हीं शरण आलों किंवा आम्हीं तह करतों असा बहाणा करून युद्ध थांबवून एकाएकीं हल्ला करणें क्षम्य होणार नाहीं. पाश्चात्य देशांत शरण आल्याची खूण White flag पांढरें निशाण फडकावणें ही ठरली आहे. पांढरें निशाण फडकाविलें असतां मग गोळी टाकणें किंवा शस्त्र चालविणें प्रशस्त मानलें जात नाहीं. आणि असें झाल्यावर मनुष्यें मारलीं गेलीं तर तो खून Murder समजला जाईल.गेल्य ।जर्मन युद्धांत खोट्या रीतीनें पांढरें निशाण उभारून जर्मनांनीं छल केला असा रिपोर्ट प्रसिद्ध झालेला आपण वाचला आहे आणि ही गोष्ट खरी असली तर अक्षम्य आहे, हें उघड आहे. तहाचें बोलणें सुरू करून धोक्यानें व दग्यानें सेनापतीस किंवा सरदारांस ठार मारल्याचे दाखले इतिहासांत सांपडतील. पण असें करणें निंद्य अफझलखानानें शिवाजीस सामोपचाराचें बोलणें सुरू करून पकडण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट निंद्यच मानली जाईल आणि शिवाजीनें हा डाव ओळखून अंगांत गुप्त चिलखत घालून बिचव्यानें हा डाव अफझलखानावर उलटवून त्याचा वध केला. हा खून नसून योग्य व न्याय्य वध झाला असेंच इतिहासकार ठरवितात व ठरवतील. असो तर, युद्ध थांबवून तह करतों म्हणून तहास बोलावणें व दगा करणें निंद्य आहे. हा अपवाद सोडून, युद्ध चालू असतां

इतर रीतीचा दगा करणें किंवा Surprise एखादी फसवणूक करणें क्षम्य आहे आणि म्हणूनच शंभूजी कावजी यानें केलेला हंणमंतरावाचा वध क्षम्य आहे असें ठरतें. शंभूजी कावजी यानें तहाचें बोलणें लावून युद्ध थांबवलें असें सभासदानें ह्मटलें नाहीं. फक्त सोयरिकीचें नातें लावून त्यानें एकान्तांत त्याजवर कट्यार चालविली असें लिहिलें आहे. हें सोयरिकीचे नातें अर्थात त्याचेंच असावें. कारण लावून बोललेल्या शब्दांत पुढील होणाऱ्या दुसऱ्याच्या संबंधाचा अन्तर्भाव होत नाहीं या संदिग्ध शद्बावरून पुढील बखरकारांनीं शिवाजीनें चंद्रराव मोऱ्याची मुलगी लग्नांत मागितली असा तर्क काढला आहे. पण शिवाजी म-हाराजांचें उदात्त चरित्र पाहतां किंवा त्यांच्या कुशल राजनीतीच्या व्यवहाराकडे पाहतां हें संभवनीय दिसत नाहीं. चंद्रराव मोऱ्याची मुलगी फार सुंदर होती असें कोठें लिहिलेलें आढळतें? पण सुंदर मुलीचाहि मोह शिवाजीस कधींच झाला नाहीं. मोऱ्याचें राज्य स्वतंत्र असून त्यास मुलगे नव्हते अशी परिस्थिति असती तर कदाचित त्याच्या मुलीशीं लग्न करणें राजनीतीच्या व्यवहारांत युक्त वाटलें गेलें असतें. पण तशीहि परिस्थिति नव्हती. त्यांचें राज्य परतंत्रतेचें असून तें मारणें कठिण नव्हतें आणि चंद्रराव मोऱ्याचा जांवई या नात्यानें शिवाजीस मुळींच मोठेपणा आला नसता. या दृष्टीनेंहि ही गोष्ट असंभवनीय दिसते. शिवाजीस लग्न करावयाची इच्छा कोणत्याहि कारणानें झाली असती तर जय मिळाल्यावर व राज्य खालसा झाल्यावर आणि मोऱ्याचे कबिले हातीं आल्यावर ही गोष्ट शिवाजीनें घडवूनहि आणली असती. तात्पर्य शिवाजीनें मोऱ्याची मुलगी लग्नांत मागितली ही गोष्ट असंभवनीय दिसते. आणि या गोष्टींचा बहाणा करून शिवाजीनें रघुनाथ बल्लाळ यास चंद्रराव मोऱ्याकडे पाठविलें ही त्याहून चुकीची कल्पना. कारण यास सभासदाचाहि आधार नाहीं. रघुनाथ बल्लाळ यास राजकीय वकील या नात्यानें राजकीय बोलणें करण्यास व आपलें स्वामित्व तुम्ही मानलें पाहिजे हें सांगण्यास हेजिब पाठविला होता असें सभासद स्पष्ट लिहितो. अर्थात शिवाजीनें मोऱ्याच्या सुंदर मुलीची मागणी केली ही कविकल्पना होय.

येथवर आपण सभासदाच्या बखरीची छाननी व त्यावरून दिसून येणाऱ्या हकीकतींचें तत्कालीन व हल्लींच्या राजनीतीच्या दृष्टीनें परीक्षण करून

शिवाजीचें कृत्य अन्याय्य कीं न्याय्य याची चिकित्सा केली; आणि असें ठरविलें कीं चंद्रराव हा विजापुरकरांचा मांडलिक त्याच्या वर्तीनें शिवाजीच्या राज्यस्थापनेस किंबहुना स्वराज्य स्थापनेस प्रतिकूळ होता या साठीं त्याला विजापुरकरांचें दास्य सोडून आम्हांस राजा मान्य करून, स्वराज्यसाधनेस अनुकूळ हो नाहीं तर मारला जाशील असा राजकीय संदेश रघुनाथ बल्लाळ यास हेजिब नेमून त्याजकडून कळविला. त्यानें तो मान्य केला नाहीं. आणि जावळीस उद्यां येत साल तर आजच या असा स्पष्ट जबाब दिला. या वकिली बोलण्यांत कांहा तरी हा[illegible]बाची झाली. चंद्रराव मोरे कैफी दारुबाज होता. काय बाचाबाची झाली तें किं[illegible]ा येत नाहीं असें जें किन्केड व पारसनीस यांनीं आपल्या इतिहासांत लिहिलें आहे तेंच योग्य दिसतें. कदाचित तक्रारीवर येऊन राघो बल्लाळावर हात सूर्यरावानेंच उचलला. तो निघून जात असतांना मागून त्याच्यावर लाग केला असेल. ( हें करणें अर्थात गैर होतें कारण दूत कांहीं बोलला तरी तो क्षम्य आहे दंड्य नाहीं असें रामायणकाळांतहि मान्य होतें आणि मारुति किंवा अंगद यास दूत असल्यानें शिक्षा करणें अन्यायाचें होईल असें स्पष्ट बिभीषणानें बजाविलें आहे. ) या दंग्यांत राघोबल्लाळचे लोक शूर असल्यानें कचरले नाहींत. सूर्याजीराव यास मारून दरवाजाबाहेर पडले. सूर्याजीराव मालक पडल्यानें पुढें लाग झाला नाहीं. रघुनाथ बल्लाळनें शिवाजीस खबर दिली आणि त्यानें ताबडतोब जावळीवर स्वारी केल[illegible] [illegible]ावेळीं चंद्रराव मोरे बाहेर येऊन शिवाजीशीं लढला आणि लढाईत मारला गेला. जावळी स्वाधीन झाली. चतुर्बेट येथें कारभारी हणमंतराव मोरे जमाव धरून लढूं लागला मग त्यास शंभूजी कावजी यानें छल करून मारला व जावळीचें राज्य निष्कंटक खालसा केलें अशी ही हकीकत दिसते. राज्यसाधन आत्मसंरक्षण, स्वराज्यसाधन या तिन्ही कारणासाठीं शिवाजीमहाराजांनीं आम्ही राजे आहों स्वतंत्र राजे आहों हें जाहीर केल्यानंतर चंद्ररावास प्रथम स्वराज्यांत सामील होण्याची संधि देऊन त[illegible] फुकट गेल्यावर त्याजवर हल्ला केला व युद्ध करून जावळी घेतली, यांत कोणतीच गोष्ट राजनीतीच्या दृष्टीनें निंद्य नाहीं. युद्ध सुरू झा[illegible]ल्या[illegible]वर छलानें हणमंतराव यास शंभूजीनें मारलें तें Everything is fair in war या नात्यानें क्षम्य आहे असेंच प्रत्येकास वाटतें. जदुनाथ सर.

कार या कृत्यांस Murder खून म्हणतात किंवा हें स्वराज्यसाधनासाठीं नव्हतें असें म्हणतात तें सपशेल चुकीचें आहे. *

ही अशी मूळ हकीकत असून तिचा थोडासा विपर्यास तिखटमीठ लावण्याच्या साहाजिक मोहानें बखरकारांनीं कसा केला हें दाखविण्यास त्यांतील उतारे देणें पुरें आहे. हे सर्व बखरकार ऐकिव किंवा सभासदावरून थोडासा फेरफार करून हकीकत सांगतात. सभासदाची बखर शिवाजीच्या मृत्यूनंतर ( १६८० ) १७।१८ वर्षांनीं लिहिलेली म्हणजे १६९७।९८ ची सर्वांत जुनी. त्यानंतर शिवदिग्विजय ही बखर शके १६४० सन १७१८ म्हणजे सरासरी सभासदा नंतर २० वर्षांनीं पण बहुतेक स्वतंत्र माहितीनें लिहिली आहे. तींत चंद्रराव मोरे लढाईंत मारला गेला असें स्पष्ट सभासदाच्या विरुद्ध वर्णन असून त्यांतील हकीकत प्रथम देऊं. "त्यानंतर जावळी येथें चंद्रराव मोरे विजापुराचे **चाकर** जहागीर खाऊन होते ... त्यांजला महाराजांनीं सांगून पाठविलें कीं तुम्ही पातशहास करभार देतां तो आम्हांस द्यावा. आमचे म्हणोन रहावें ...... म्हणोन सांगोन पाठविलें. महाराजांनीं विचार केला, मऱ्हाटी सरदारी बहुत दिवसाची जमली आहे. प्रथम साम करोन पहावें. आपल्या विचारांत आला तर राखावा नाहींतर पारिपत्यास उशीर काय आहे? वकील पाठवला तो जाऊन चंद्रराव मोऱ्याशी बोलतां मोरे यांनीं महाराजांची खातर मनांत न आणिली ...... कांहीं बोलोन निरोप घेऊन येऊन त्यानीं महाराजांस निवेदन केलें. महाराज राजगडास बंदोबस्तास गेले. तेथोन तीनचारशें पराक्रमी माणसें रघुनाथ बल्लाळ यास देऊन हणमंतराव मोरे, चंद्रराव यांचे भाऊ कुलेकारभारी

---

*जदुनाथांनीं याही पुढें थोडीशी चर्चा करून पारसनीस यांच्या महाबळेश्वर या इंग्रजी लेखांत दिलेल्या हकीकतीवर दुलत्ती झाडली आहे, आणि चंद्रराव मोऱ्यानें दग्यानें शिवाजीस पकडून देण्याचा प्रयत्न केला म्हणून शिवाजीनें त्याचा दग्यानें खून करविला असें विसाव्या शतकांतले लुच्चे महाराष्ट्रांतील संशोधक कोठली तरी रावण-कुंभकर्णी बखर दाखवून शिवाजीच्या दुष्ट कृत्यांवर पांघरूण घालूं पहात आहेत असें म्हण्टलें आहे. ( पान ५४ ). याचें उत्तर येथें अनवश्यक आहे हें उघड आहे. वरील विवेचनावरून त्याची जरूरी नाहीं, आणि ही नवी बखर विश्वसनीय आहे कीं नाहीं याची माहिती पारसनीस देतीलच.

जोहारखोरे येथें कामाकरितां आले. शरीर संबंधाचे करण्याकरितां पाठविले. रघुनाथपंतीं मोरे यांस सांगून पाठविलें कीं तुमच्या घरीं मुली आहेत. त्यांच्या बोलण्याकरितां आलों. ते समयीं मोरे बेफाम होते, कारण शरीरसंबंधाचे बोलण्याकरितां आले; संधीकरितां नाहीं. रघुनाथपंत जाऊन प्रथम भेटींत बेसरंजाम पाहून मोरे यास मारून दरवाजांवरील लोकांस मारामार करून ... वाई मुक्कामीं महाराजास वर्तमान विदित केलें .. .. महाराजांनीं विचार केला. हणमंतराव कर्ता मनुष्य होता तो मारला. आतां त्याचे योग्यतेचा माणूस त्यांचे जवळ नाहीं, याच समयीं चंद्रराव मोरे याशीं गांठ घालावी... तात्काळ तयारी करून निघाले, महाबळेश्वरीं सांबाचें दर्शन घेतलें ध्यान... करोन त्याच घाटानें खालीं उतरले. रघुनाथ बल्लाळ अत्रे याजबरोबर पांच सात हजार मावळे व पाचशें स्वार देऊन रडतोंडीचे घाटानें यावें असा संकेत करून एकसमयावच्छेदें उभय सैन्यें जावलीस सूर्योदयी लागलीं. तेथें सरंजाम बहूत चंद्रराव मोरे दोन प्रहरपर्यंत युद्ध करून जवान मर्दानीनें लढाई दिली. ...मोरे यांचे सैन्याचा पराभव झाला, चंद्रराव मोरे **लढाईत मारले गेले**. त्यांचे पुत्र बाजीराव मोरे व कृष्णराव मोरे काबिले सहित कैद झाले. मोरे यांनीं अमोल वस्तुसंग्रह केला होता ती सर्व हरण केली. त्या संधींत विजापुरकराकडे कारण करून पळून जावें असा विचार केला त्यांचे कागदपत्र मुद्देदस्त केले आणि रुजूवात करून शके १५६४ चित्रभानु संवत्सरीं उभयतांचा शिरच्छेद केला. बायका व लेकी सोडून दिल्या. मोरें यांनीं पहाडावर मेढा बांधून पूर्वी वस्ती केली होती अशी बाकी जागा महाराजांचे अन्तःकरणांत वाटून पक्की इमारत करवून किल्ला केला त्याचें नांव प्रतापगड ठेविलें." ही हकीकत बरीच विस्तृत असून सभासदाहून अत्यंत भिन्न आहे. या बखरीचा लिहिणारा खंडोबल्लाळ शिवाजीमहाराजांचा चिटणीस आवजी बाळाजी याचा पुत्र हा होता असें प्रस्तावनेंत म्हटलें आहे. तो माहितगार असावा आणि त्यानें किंवा दुसऱ्या कोणी शिवाजीच्या मृत्यूनंतर ३८ वर्षांनींच ती लिहिली असल्यानें सभासदाच्या जोडीला ठेवण्यासारखी आहे. यांत हणमंत मोऱ्याचा खून अगोदर झाला आणि रघुनाथानें केला असें जरी म्हटलें आहे तरी चंद्रराव मोरे लढाईंत मारला गेला असें स्पष्ट म्हटलें आहे. त्यांत कांहीं विपर्यासाचा जरी दोष असला तरी हेंच विधान मान्य करण्यासारखें आहे हें पूर्वी विस्तारपूर्वक दर्शविलेंच आहे.

जदुनाथ सरकारानें उल्लेखिलेल्या बखरी पैकीं तिहींचा येथवर विचार झाला. सभासद, शेडगांवकर आणि शिवदिग्विजय. यांच्यांतील विरुद्ध हकीकतीचा त्यानें मुळींच विचार केला नाहीं. त्यानें उल्लेखिलेल्या चौथ्या बखरीचें काय ह्मणणें ते पाहूं. चिटणीसाची बखर ही बरीच अलीकडची म्हणजे राज्याभिषेक १३७ ह्म० इ. स. १८०७ ची आहे. अर्थात ती केवळ ऐकिव व पूर्व बखरीस धरून व कांहीं अधिक अतिशयोक्तियुक्त मात्र आहे. त्यांतील हकीकत येणेंप्रमाणें. "चंद्रराव मोरे जावळीकर दहाहजार लोकांसह किल्ले वगैरे बळावून होते. त्यासी सलुख लाऊन तुम्हीं आमचे ह्मणावें आज्ञेंत वागावें असें राजकारण लाविलें असतां मुद्दाईनें (खुदाईनें,) ? (महाराजांस खातरेंत न आणतां वागूं लागलें याबद्दल विचार केला. मावळे लोकांचा सरदार हातीं न लागे. कावेबाजीनें हातीं घ्यावा ह्मणून त्याजकडे बोलण्यास राघोबल्लाळ सबनीस यास पाठविलें...त्यानें जाऊन शरीरसंबंधाचें बोलणें लाविलें आणि राहिले. विचार पाहिला. चंद्रराव कैफी, लोकांचीहि फूट पाहून महाराजांकडे लिहून पाठविलें. काम करितों तुह्मी यावें. त्या अवसरांत रघुनाथपंतानें चंद्रराव याचा भाऊ सूर्यराव या दोघांस खलबतास ह्मणून नेले तेथेंच मारलें आणि दरवाजास आले. तों लोक कांहीं सावध झाले, थोडे होते त्यास मारामार करून सांभाळून आपले लोकांत आले. तेथोन निघोन संभाजी कावजी यानें मोरे याचे कारभारी हनूमंतराव ह्मणून नामी सरदार होते त्यास मारले. महाराज महाबळेश्वरी होतेच त्यांनीं येऊन दोन प्रहरपर्यंत युद्ध केलें ठाणें घेतलें; चंद्रराव याचे लेक बाजीराव व कृष्णराव धरले. पुरंदर येथें कैदेंत ठेविलें. आणि कबिले आणि लोक फक्त पुण्यास नेऊन दक्षिणेकडे निमाजगा (निंमाज गाह ?) आहे तेथें मारले. कांहीं दिवसांनीं कबिले सोडले. जावळी घेतली शके १५७७" या वर्णनांत मुख्य गोष्टी त्याच आहेत. पण तपशिलाच्या गोष्टींत बऱ्याच चुका स्पष्ट दिसतात. चंद्रराव मोरे यांशी प्रथम राजकारण लावून तुह्मी आमच्या स्वराज्य स्थापनेला अनूकूल व्हा असें शिवाजीनें सांगून पाठविलें हें यांतहि आहे. मग त्याजकडे जदुनाथ दुर्लक्ष करितात हें आश्चर्य नव्हे काय? रघुनाथ बल्लाळ शरीरसंबंधाच्या गोष्टी करण्याकरितां गेला नव्हता असें सभासद स्पष्ट ह्मणतो तें बोलणें शंभूजी कावजी यानें हणमंतरावाशीं केलें असें लिहितो. येथें त्याचा विपर्यास केला आहे, आणि

शंभूजी यानें हणमंतराव यास कसें मारलें हें यांत मुळींच सांगितलें नाहीं. तात्पर्य एकंदर तपशिलाचा विचार करतां चंद्रराव मोऱ्यास शिवाजीनें लग्नाचे बोलणें लावून दग्यानें मारला नाहीं. तो लढाईंत मारला गेला हाच इत्यर्थ ठरतो. बहुधा शंभूजीनें लढाई सुरू झाल्यावर आपल्या सोयरीकेच्या नात्यानें हणमंतरावास एकांतीं गांठून दग्यानें मारलें असा प्रकार असून याचा अतिदेश पूर्व कुल्यावर अतिशयोक्तीनें चंद्रराव मोऱ्याच्या मृत्यूवर अलीकडचे बखरकार करतात. चंद्रराव मोऱ्याचा खून लग्नाच्या गोष्टीचा बहाणा करून शिवाजीनें करविला असता तर शंभूजी कावजीच्या त्याच ठकवाजीस हणमंतराव बळी पडला नसता हें पूर्वी सांगितलेंच आहे. इतकेंच नव्हे तर ह्या दग्याच्या बातम्या त्यावेळीं प्रसिद्ध झाल्याच असत्या आणि या वृत्तानंतर लवकरच अफझलखान शिवाजीवर चालून आला, त्यावेळीं ह्या शिवाजीच्या वर्तणुकीचा गोंगाट त्याच्या कानावर गेलाच असता आणि तो शिवाजीच्या विनंतीप्रमाणें त्याची एकान्तीं भेट घेण्यास कधींच प्रवृत्त झाला नसता. कदाचित् ठकास सवाठक अशा भावनेनें व स्वतःच्या प्रचण्डशक्तीच्या घमेंडीनें तो गेलाच असता तर अंगांत चिलखत घालून तरी गेला असता हें उघड आहे. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं शिवाजीनें चंद्रराव मोऱ्याचा खून दग्यानें करविला असा प्रवाद अफझलखानाच्या वधापर्यंत खचित प्रचलित नव्हता. हा प्रवाद शिवाजीच्या मरणोत्तर कित्येक वर्षांनीं म्हणजे ६०।७० वर्षांनंतर बखरकारांनीं अतिशयोक्तीच्या सोहास बळी पडून चालू केला असें दिसतें. आणि तो जदुनाथ सरकार सारख्या विरोधीभक्तांनीं छाननीं केल्याशिवाय घेतला असें स्पष्ट दिसतें- वास्तविक रीत्या चंद्ररावाचा खून झाला नसून तो लढाईंत मारला गेला हें शिवदिग्विजयांत लिहिलेलें इतिवृत्त खरें आहे.

या विषयाची येथें परिसमाप्ति झाली. अन्य लहान बखरींची चर्चा करण्याची अवश्यकता नाहीं. पण समाप्ति करण्यापूर्वी एका प्रश्नाची सविस्तर चर्चा करणें जरूर आहे. चंद्रराव मोरे यांचे दोन पुत्र लढाईंत कैद झाले त्यांचा शिरच्छेद पुण्यास नेऊन शिवाजीमहाराजांनीं करविला असें सर्व बखरकार सांगतात. हें कृत्य न्याय्य होतें काय ? ठाण्याच्या भाव्यांनीं याची हकीकत भलतीच आपल्या 'अफझलखानाचा वध' या पुस्तकांत पहिल्याच पानावर दिली आहे आणि या

करण्याचा नीतिदृष्ट्या निषेध केला आहे. ते लिहितात पुढें बाजीराव मोरे व या चंद्ररावाच्या **भावास** (१) **बोलावून आणून** (१) त्यांचा शिरच्छेद केला. या घराण्यांतील लहान लहान मुलें जीं जीं महाराजांच्या हातीं लागलीं त्या सर्वास त्यांनीं ठार मारलें. बापाच्या अपराधाकरितां अजाण पुरुषांस व अजाण लेकरांस मारून त्यांचे प्राण हरण करावे हें हल्लींच्या मनूंत कोणास रुचणार नाहीं. त्यांतून बापाचे अपराध किती घोर होते हें बखरींवरून दिसतेंच आहे. शिवाजीची सत्ता चंद्रराव मोऱ्यानें मान्य केली नाहीं हाच त्याचा मोठा अपराध." या अनेक विधानांस आधार काय ? आणि असें शिवाजी महाराजांच्या न्याय्य कृत्याचें क्रौर्य दर्शविणारें भलतेंच भेसुर चित्र भ्रमानें भाव्यासारख्या आमच्याच प्रिय इतिहासलेखकांनीं काढावें हें आश्चर्य नाहीं काय ? जदुनाथ सरकार सुद्धां या मोऱ्याच्या वधास Murder हा शब्द लावीत नाहींत. The two sons of More were put to death असें म्हणतात. 'तीन मोऱ्यांचे खून' हे शब्द चंद्रराव सूर्याजीराव व हणमंतराव यांच्या वधाबद्दल लावतात. भावे या मुलांस बोलावून मारलें असें लिहितात हें कोठून ? ते भाऊ होते हेंहीं चुकीचें दिसतें. ही मुलें लहान होतीं अशीहि ते कल्पना करतात. पण ते १५. १६ वर्षांचे होते असें वर्णन ९१ कलमी शिवाजी बखरींत स्पष्ट आहे. आणि या मुलांनीं विजापुरच्या दरबारशीं राजकारण सुरू केलें होतें व या गोष्टींचा कागदोपत्रीं पुरावा शिवाजी महाराजांनीं त्यास दाखविला आणि मग त्यांचा शिरच्छेद करविला असें वर्णन चिटणीस बखरींत असलेलें वर उध्दृत केलेंच आहे. त्याचा उल्लेख भावे करीत नाहींत !! सर्वच भलता प्रकार !!!

हल्लींच्या मनूंत असलें कृत्य कोणास रुचणार नाहीं असें भावे लिहितात, पण तेंहि सपशेल चुकीचें आहे. हल्लीं हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या सामान्य व्यवहारास लागू असणारा पीनलकोड पाहिला तर राजाच्या विरुद्ध लढाईचा प्रयत्न करणाऱ्यास देहान्त शिक्षा सांगितली आहे. शिवाजीनें जावळीचें राज्य खालसा केल्यानें हे चंद्ररावाचें पुत्र शिवाजीच्या राज्यांतील प्रजेच्या स्थितींत होते, तेव्हां त्यांनीं विजापुरकराशीं फितुरीचा प्रयत्न करणें देहान्त शिक्षेच्या लायक होतें. बरें ते चौदावर्षांच्यावर असल्यानें पीनलकोडाप्रमाणें गुन्हेगार ठरण्यासहि योग्य होते. लहान मुलें असा शब्द मोघम भावे वापरतात. पण हें पुत्र १५

१६ वर्षांचे होते आणि राजाचे मुलगे या वयांत किती प्रौढ असतात इतर स्थितींतल्या मुलांहून किती ज्यास्त वाढलेलें असतात हें हजारों उदाहरणांवरून सिद्ध होईल. शिवाजीनें सुद्धां तेराव्या वर्षांपासून राज्य आटोपण्यास आरंभ केला. तात्पर्य १५।१६ वर्षांचे हे चंद्ररावाचे पुत्र पूर्ण जाणते असून कारस्थान करूं लागले तेव्हां मृत्यूची शिक्षा पावले हें न्याय्यच झालें.

आतां या कृत्याकडे राजकीय दृष्ट्या पाहूं. युद्धांत शत्रूस जिंकल्यानंतर जे लोक विषेषतः अधिकारी पाडाव होतील त्यांस जेत्यानें ठार मारावें; कैदेंत ठेवावें किंवा इच्छेस येईल तर मुक्त करावें असाच आजपर्यंतच्या इतिहासावरून राजनीतीचा नियम निघतो, किंबहुना प्राचीन, प्राच्य व पाश्चात्य इतिहासाकडे पाहिलें तर जय झाल्यावर युद्धांत पाडाव झालेलेच नव्हे तर सामान्य शस्त्रधारी क्षत्रिय किंबहुना निःशस्त्र व न लढणारीं माणसें हजारों कत्तल केलीं गेलीं आहेत असें दिसतें. एक प्राचीन भारती आर्यांनीं मात्र जगाच्या अतिशय पुढें जाऊन अयुध्यमान, शस्त्रहीन, पलायमान यांजवर शस्त्र चालवूं नये असा धर्म–युद्धाचा उदात्त नियम घालून दिला होता. तो आतां कोठें पाश्चात्य राष्ट्रांत मान्य होऊं लागला आहे. पण इतर प्रसंगीं व ठिकाणीं पहावें तों पाश्चात्यांनीं हजारों लोकांच्या कत्तली युद्ध–जयानंतर केलेल्या आहेत. रोम व ग्रीस या राष्ट्रांच्या इतिहासांत तर कत्तली शिवाय जिंकलेल्या लोकांस गुलामगरींत खेंचून नेण्याचा प्रघात सर्वत्र जारी होता. अलेक्झांडरनें हिंदुस्थानांत शहरें जिंकल्यानंतर हजारों अयुध्यमान क्षत्रियांच्या कत्तली केल्या. एके ठिकाणीं राजास ब्राह्मणांनीं युद्धास प्रवृत्त केलें या आरोपावरून हजारों ब्राह्मण त्यानें मारले. हा हिंदुस्थानचा इतिहास पाश्चात्यांनींच लिहिलेला आहे. महंमद गजनी, तैमुरलंग वगैरे मुसलमानी जेत्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत हजारों लोकांच्या कत्तली करून मुंडक्याचे पिरामिड रचले. दक्षिण हिंदुस्थानांतहि मुसलमानी बादशहांनीं अशाच भयंकर कत्तली केल्या आहेत तालीकोटच्या विजयानंतर एक लाख हिंदु-निरपराध अयुध्यमान मारण्याचा संकल्प एका बादशहानें करून पार पाडला. मुसलमान लोक क्रूर आणि हीन संस्कृतीचे, सुधारलेल्या इंग्रजांनीं सुद्धां हल्लींच्या मनूंत १८५८ सालाच्या बंडांत विजय झाल्यावर काय केलें? झांशी शहर घेतल्यावर निरपराध बिन लढवाई प्रजेचें बिजन केलें ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

पाश्चात्य देशांच्या इतिहासांत वेढ्यानंतर शहर काबिज झालें म्हणजे बहुधा आंतील लोकांचें बिजन झाल्याशिवाय राहिलें नाहीं. या दहशतीकरितां केलेल्या कत्तलीस खून ही संज्ञा देतां येत नाहीं हें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे. हीं कृत्यें क्रूर होत पण अन्यायाचीं किंवा अक्षम्य नाहींत हें मान्य करावें लागेल. Everything is fair in war या तत्वानें तीं क्षम्य मानली जातात हे खरें. असल्या क्षम्य पण क्रूर कत्तलीसुद्धां शिवाजी महाराजांनीं कधींहि केल्या नाहींत ही गोष्ट त्यांच्या इतिहासांत स्पष्ट दिसते. अयुध्यमान प्रजेच्या कत्तली युद्धांतील विजयानंतर त्यांनीं केल्या नाहीत हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे. किंबहुना वर सांगितल्याप्रमाणें लढाईत पाडाव झालेले फौजी सरदार सुद्धां त्यानीं मारले नाहींत, कैदेंत ठेविले नाहींत तर गौरवून वस्त्रालंकार देऊन मोंगलाकडे किंवा विजापुरवाल्याकडे वारंवार परत पाठविले आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

लढाईंत पाडाव झालेल्या राजासंबंधें किंवा युद्धनेत्यासंबंधें आणखी निराळी दृष्टि राजनीतींत आहे. अशा मनुष्यास मारून टाकणें हेंच पुष्कळप्रसंगीं क्षम्यच नव्हे तर युक्त दिसतें. राज्य खालसा केल्यावर राजास जिवंत ठेवणें म्हणजे लढाईचें मूळ आणि हजारों लोकांच्या मृत्यूचें कारण बाकी ठेवणें होय. याचमुळें अशा प्रसंगीं त्यास मारून टाकण्याचा जेत्याचा अधिकार आहे. पण कैदेंत ठेवण्याचा अधिकार हल्लींच्या मनूंत सुद्धां सर्वत्र मान्य आहे. दत्ताजी शिंद्यास लढाईंत पाडाव झाल्यांनतर याच न्यायानें नजीबखानानें मारलें आणि नजीबखानाचा शिरच्छेद याच न्यायानें सदाशिवभाऊनीं करविला. शाबुद्दीन गोरीनें याच न्यायानें पृथ्वीराजास ठार मारविलें; व तैलपानें मुंज राजास सुळावर चढविलें, शेवटच्यास तैलपानें प्रथम कैदेंत ठेविलें होतें पण त्यानें कैदेंतून सुटून जाण्याच्या प्रयत्न केला तेव्हां त्यास देहान्त शिक्षा दिली. नेपोलियनास इंग्रजांनीं याच न्यायानें जन्मभर कैदेंत ठेविलें तें हल्लीच्याच मनूंत. यासाठीं कीं, यानें पुन्हा उठून हजारों लोकांच्या लढाईंत मृत्यूस कारणीभूत होऊं नये. तात्पर्य या राजनीतीचा विचार करतां शिवाजी महाराजांनीं चंद्रराव मोऱ्याच्या दोघां पुत्रांस प्रथम कैदेंत ठेविलें हें अन्यायाचें किंवा गैर कृत्य नव्हतें. आणि त्यांनीं जेव्हां विजापुरकराशीं मिळून पुन्हां स्वराज्य स्थापनेच्या कार्यास विघ्न केलें तेव्हां मुद्दा पुरावा मिळाल्यावर तो दाखवून त्यांचा शिरच्छेद करविला हें युक्तच झालें.

शिरच्छेद करणें, मारणें, खून करणें या शब्दांत जरी वध हाच मुख्यार्थ असला तरी इंग्रजी Behead, Kill, Murder या शब्दांतल्या प्रमाणेंच निंद्यानिंद्यत्वाचा व्यङ्ग्यार्थ नेहमी प्रतीत होतो हें लेखकांनीं व वाचकांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. खून अथवा Murder या शब्दांत हें कृत्य निंद्य आहे असा ध्वनि नेहमीं असतो व म्हणूनच याला Culpabable homicide असा कायद्यांत शब्द असून Murder ही त्याची शेवटची पायरी आहे. मारणें, वध करणें अथवा Kill यांत निंद्यानिंद्यत्वाचा बोध होत नाहीं. आणि behead अथवा शिरच्छेद करणें या शब्दांत नेहमीं कांहीं तरी अपराध लावून ज्यास अपराधाबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार आहे अशा मनुष्यानें शिक्षा दिल्या नंतरचा वध असा अर्थ ध्वनित होतो. चंद्रराव मोऱ्यांचा व पुत्राचा शिरच्छेद केला असाच शब्द सर्व बखरींत आहे आणि एका बखरींत यांनीं कोणता गुन्हा केला आणि त्याच्या अंगीं तो लावून दिला हेंही स्पष्ट केलेलें आहे. अर्थात् या पुत्रांचा वध न्याय्य होता असेंच सर्व बखरकार म्हणतात आणि राजनीतीच्या व कायद्याचा हल्लींच्या दृष्टीनेंहि विचार करतां शिवाजीनें केलेलें हें कृत्य न्याय्य होतें असेंच ठरतें.

किंबहुना हा शिरच्छेद शिवाजीमहाराजांनीं अतिशय नाखुषीनें केवळ नाइलास्तव केला असला पाहिजे. मराठे शूरवीरांस एकत्र करून आपल्या स्वराज्य स्थापनेच्या पवित्र कृत्यांत मदतीस घेणें हें तर त्यांना इष्ट होतें आणि असा प्रयत्न त्यानीं सतत चालविला होता. ‘ मराठा तितुका मिळवावा’ ही शिकवणूक त्यांस उपजत राजनीतीनें व नंतर गुरूनें दिलेलीं होती. हीं मुलें जर शिवाजीमहाराजांच्या पवित्र कार्यास अनुकूल झालीं असतीं आणि विजापुरकरांचे दास्य पतकरून शिवाजीच्या कार्यास विघातक होण्याच्या प्रयत्नास लागलीं नसतीं तर शिवाजीमहाराजांनी खातरीनें त्यांस जावळीसच नव्हे तर इतरत्र जहागीर देऊन त्यास नांवारूपास चढविलें असतें. चंद्रराव मोऱ्याचा अपराध तरी हाच आणि त्याच्या तरी पुत्राचा हाच. स्वराज्य-स्थापनेच्या उदात्त कार्यास प्रतिरोध करणार साप किंवा सापांचीं पोरें मारून टाकणें हेंच न्याय्य होतें आणि तें कृत्य करणाऱ्यास लागणारा मनाचा क्रूरपणा शिवाजीनें दाखविलाच पाहिजे होता. तसा दाखविला नसता-

तर स्वराज्य साधन कधींच झालें नसतें. पण रा. भावे यांनीं या पुत्रांस उगीच्या उगीच मारलें असें भासविण्याचा जो प्रयत्न केला आहे तो केवळ चुकीचा आहे. शिवाजीच्या हृदयांत निरर्थक करता नव्हती ही गोष्ट त्याच्या अनेक कृत्यांवरून दिसेत. त्यानें शेकडों लढाईत पाडाव केलेल्यांस जविदान देऊन सोडलें. यानें तैमूर किंवा महनदाप्रमाणें दहशत बसण्यासाठीं सुद्धां कधीं कत्तली केल्या नाहींत. हें इतिहासावरून सिद्ध होत असतां शिवाजीमहाराजांच्या उदात्त चरित्रास असा कलंक लावणें चुकीचें आहे. शिवाजीमहाराज कोणाच्या कत्तली करतील? रयतेच्या लोकांच्या परकीय राजांना हें युक्त असेल पण शिवाजीच्या स्वराज्य-स्थापनेच्या महत्कार्यास ते विघातकहि होतें. तेंव्हां स्वार्थ-दृष्टीनें सुद्धा असा वध करणें युक्त नाहीं हें शिवाजी जाणून होता. पण आडवें आलें म्हणजे पोटचें सुद्धा कापून काढावें लागतें या न्यायानें या दोघे मराठे वीरांस शिवाजीस शिरच्छेदाची शिक्षा देणें भाग पडलें असेंच दिसतें. असो, शिवाजी लुटारु; शिवाजी खुनी, असा भ्रम मागच्या पिढींत तीस वर्षांपूर्वी मुसलमानी इतिहासाचें सहेतुक अनुकरण करणाऱ्या इंग्रजी इतिहासावरून महाराष्ट्रांत झाला होता आणि मोगलाच्या विरोधी इतिहासाचें पूर्वावलोकन झाल्यानें प्रथम नासकें तूप भरलेल्या भाड्यांत मागून चांगलें भरलें तरी जशी घाण जात नाहीं त्याप्रमाणें जदुनाथ सरकार सारख्या बंगाली इतीहासकारांच्या लेखांत अजूनहि आहे. पण या पिढींत महाराष्ट्रांत शिवाजीमहाराजांच्या चारित्राच्या उदात्तत्वाविषयीं निःशंकपणा वावरत असतां भाव्यांसारख्या महाराष्ट्रभक्त लेखकाच्या विचारसरणींत हा भ्रम पुनः उत्थित व्हावा, किंबहुना राजनीतींत व इतिहास यांच्या हल्लींच्या दृष्टीनें जे उत्तम विचार भाव्यांनीं आपल्या पुस्तकाच्या अफझलखानाचा वध दूष्य किंवा प्रशस्य याची चर्चा करतांना नमुद केले आहेत तेच विचार पुस्तकाच्या प्रारंभीं चंद्रराव मोऱ्याच्या प्रकरणांत ते साफ विसरतात याचें राहूनराहून सखेद आश्चर्य वाटतें. या निबंधांत भिन्न दृष्टीनें केलेलें चंद्रराव मोऱ्याच्या या प्रकरणाचें विवेचन भावे व इतर वाचक सप्रेमसहानुभूतीनें वाचतील अशी आशा प्रदर्शित करून हा लेख पुरा करतों.

चिंतामण विनायक वैद्य.

दा. क. २४५७

REFBK-0002457

तर स्वराज्य साधन कधींच झालें नसतें. पण रा. भावे यांनीं या पुत्रांस उगीच्या उगीच मारलें असें भासविण्याचा जो प्रयत्न केला आहे तो केवळ चुकीचा आहे. शिवाजीच्या हृदयांत निरर्थक क्ररता नव्हती ही गोष्ट त्याच्या अनेक कृत्यांवरून दिसेत. त्यानें शेकडों लढाईत पाडाव केलेल्यांस जीवदान देऊन सोडलें. यानें तैमूर किंवा महमदाप्रमाणें दहशत बसण्यासाठीं सुद्धां कधीं कत्तली केल्या नाहींत. हें इतिहासावरून सिद्ध होत असतां शिवाजीमहाराजांच्या उदात्त चरित्रास असा कलंक लावणें चुकीचें आहे. शिवाजीमहाराज कोणाच्या कत्तली करतील? रयतेच्या लोकांच्या परकीय राजांना हें युक्त असेल पण शिवाजीच्या स्वराज्य-स्थापनेच्या महत्कार्यास ते विघातकहि होतें. तेंव्हां स्वार्थ-दृष्टीनें सुद्धा असा वध करणें युक्त नाहीं हें शिवाजी जाणून होता. पण आडवें आलें म्हणजे पोटचें सुद्धा कापून काढावें लागतें या न्यायानें या दोघे मराठे वीरांस शिवाजीस शिरच्छेदाची शिक्षा देणें भाग पडलें असेंच दिसतें. असो; शिवाजी लुटारू; शिवाजी खुनी, असा भ्रम मागच्या पिढींत तीस वर्षांपूर्वी मुसलमानी इतिहासाचें सहेतुक अनुकरण करणाऱ्या इंग्रजी इतिहासावरून महाराष्ट्रांत झाला होता आणि मोगलाच्या विरोधी इतिहासाचें पूर्वावलोकन झाल्यानें प्रथम नासकें तूप भरलेल्या भाड्यांत मागून चांगलें भरलें तरी जशी घाण जात नाहीं त्याप्रमाणें जदुनाथ सरकार सारख्या बंगाली इतीहासकारांच्या लेखांत अजूनहि आहे. पण या पिढींत महाराष्ट्रांत शिवाजीमहाराजांच्या चारित्र्याच्या उदात्तत्वाविषयीं निःशंकपणा वावरत असतां भाव्यांसारख्या महाराष्ट्रभक्त लेखकाच्या विचारसरणींत हा भ्रम पुनः उत्थित व्हावा, किंबहुना राजनीतींत व इतिहास यांच्या हल्लींच्या दृष्टीनें जे उत्तम विचार भाव्यांनीं आपल्या पुस्तकाच्या अफझलखानाचा वध दूष्य किंवा प्रशस्य याची चर्चा करतांना नमुद केले आहेत तेच विचार पुस्तकाच्या प्रारंभीं चंद्रराव मोऱ्याच्या प्रकरणांत ते साफ विसरतात याचें राहूनराहून सखेद आश्चर्य वाटतें. या निबंधांत भिन्न दृष्टीनें केलेलें चंद्रराव मोऱ्याच्या या प्रकरणाचें विवेचन भावे व इतर वाचक सप्रेमसहानुभूतीनें वाचतील अशी आशा प्रदर्शित करून हा लेख पुरा करतों.

**चिंतामण विनायक वैद्य.**

दा. क्र. २४५७

# मंडळाचीं पुस्तकें

कै. राम गणेश गडकरीकृत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सचित्र संगीत राजसंन्यास | ... | १ | ४ | ० |
| सचित्र संगीत वेड्यांचा बाजार | ... | १ | ० | ० |
| वाग्वैजयंती ( समग्र कविता संग्रह ) | ... | २ | ० | ० |
| विनोदी लेखसंग्रह | ... छापत आहे. | | | |

कै. आण्णासाहेब किर्लोस्कर व श्रीयुत चिं. ग. कोल्हटकरकृत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सचित्र संगीत रामराज्य-वियोग | ... | १ | ० | ० |

कॅप्टन गो. गं. लिमयेकृत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| विनोदी लेखसंग्रह | ... | १ | ८ | ० |

श्रीयुत ल. ब. भोपटकरकृत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सचित्र नवरत्नांचा हार | ... | १ | ० | ० |

श्रीयुत शंकर यादव पोक्षेकृत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हिंदुस्थानची शासनपद्धति | ... | १ | ८ | ० |

वीर वामनराव जोशीकृत.

सूडाचा संदेश ... छापत आहे.

श्रीयुत गद्रेकृत.

प्रेसिडेंट विल्सनचें चरित्र ... छापत आहे.

श्रीयुत विठ्ठल सीताराम गुर्जरकृत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सचित्र संगीत राजलक्ष्मी | ... | १ | ४ | ० |
| नाट्यसुधा (गडकरी यांच्या नाटकांतल्या गोष्टी) | ... छापत आहे. | | | |
| सचित्र नंदकुमार | ... छापत आहे. | | | |

श्रीसरस्वती मंडळ,
४९५, ४९६ शनिवार पेठ, पुणें शहर.